# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सातारा

यांचे कार्यालय

समाज कल्याण संकुल,409/9 ब,सदरबझार सातारा 415001

दुरध्वनी क्र.02162-234246 Email-sdswosatara@gmail.com


क्र.सआसकआ/भासशि/अनु.जाती./शासन निर्णय/17.18/ ४५७.

दिनांक - 30.01.2018.

मा.प्राचार्य,

----------------------

----------------------

विषय-सन 2017-18 या शैक्षणिक वर्षामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील विदयार्थ्यांची शिष्यवृत्ती,शिक्षण शुल्क,परिक्षा शुल्क इ.योजनांतर्गत अनुज्ञेय लाभ अदा करणेबाबत अवलंबवयाची सुधारित कार्यपध्दतीबाबत.

संदर्भ- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक इबीसी-2017/प्र.क्र.524/शिक्षण-1 दिनांक 29/01/2018.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून अनुसूचित जाती प्रवर्गातील भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क या योजनेचे सन 2017-18 या शैक्षणिक वर्षापासुन माहीती व तंत्रज्ञान संचलनालयाने विकसित केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर विदयार्थ्यांनी अर्ज नोंदणी केलेनंतर अदा करावयाचे लाभ प्रदान करण्याबाबतची ऑनलाईन प्रक्रिया महाडीबीटी एजन्सी मार्फत राबविणेत आलेली आहे.परंतु सदर प्रणाली अंतिम टप्प्यापर्यंत कार्यन्वित करण्याची कार्यवाही अदयाप पुर्ण झालेली नसल्याची बाब निदर्शनास आली असलेकारणामुळे तातडीने उपाययोजना करणेच्या दृष्टिकोनातुन मा.मंत्री सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे अध्यक्षतेखाली दि.17.01.18 रोजीच्या बैठकित घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सन 2017-18 या शैक्षणिक वर्षातील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क,निर्वाह भत्ता इ.)योजना व राज्य शासनाची शिक्षण फि,परिक्षा फी प्रतिपुर्ती योजना या योजनेअंतर्गत अनुसूचित जातीच्या विदयार्थ्यांच्या अर्जांवर कार्यवाही करणेसाठी उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार कार्यपध्दती अनुसरण्यात मान्यता देणेत आलेली आहे.सोबत शासन निर्णयाची प्रत सोबत संलग्नित करणेत आलेली आहे.

सदर शासन निर्णयात नमुद केलेनुसार संबधित महाविदयालयाने विदयार्थ्यांचा अर्ज व प्रपत्र-ब सोबत प्रत्येक विदयार्थ्यांच्या कागदपत्रांचा प्रस्तावाच्या प्राचार्यांनी स्वाक्षांकित केलेल्या प्रती या कार्यालयास सादर करावयाच्या आहेत.प्रस्तावासोबत विदयार्थी /पालकांनी व महाविदयालयांनी ध्यावयाचे बंधपत्र संबधित महाविदयालयाच्या प्राचार्यांनी एकत्रितच संलग्न करून दयावयाचे आहे.तसेच विदयार्थ्यांने दिलेल्या बंधपत्रानुसार,विदयार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झालेली महाविदयालयाच्या फि ची रक्कम ,संबधित विदयार्थ्यांने कार्यालयीन सात दिवसांच्या आत महाविदयालयास जमा करावी.विदयार्थ्यांला मिळालेल्या शिक्षण

फि परिक्षा फी ची रक्कम जी विदयार्थ्यांने महाविदयालयास भ्रणे आवश्यक आहे.ती संबधित विदयार्थ्यांकडुन जमा करून घेणेची जबाबदारी ही संबधित महाविदयालयाच्या प्राचार्यांची राहील.सर्व महाविदयालयांनी सोबत संलग्नित असलेल्या शासन निर्णयानुसार त्वरित अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.अंमल बजावणी करणेस विलंब झालेस सर्वस्वी जबाबदारी आपली राहील कृपया याची नोंद घ्यावी.

आपला,

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण सातारा.

**1.मा.आयुक्त समाज कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य पुणे.**
**2.मा.उपआयुक्त (शिक्षण) समाज कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य पुणे.**
**3.मा.प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण पुणे विभाग पुणे.**

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इ. योजनांतर्गत अनुज्ञेय लाभ अदा करण्याबाबत अवलंबवयाची सुधारीत कार्यपध्दती.

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : इबीसी-२०१७/प्र.क्र.५२४/शिक्षण-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ जानेवारी,२०१८

**वाचा :**

(१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.ईबीसी-२०१७/प्र.क्र.४०३/ शिक्षण-१, दिनांक ०७ ऑगस्ट,२०१७

(२) शासन निर्णय, समक्रमांक-इबीसी-२०१७/प्रक्र.५२४/शिक्षण-१, दि.८ डिसेंबर,२०१७

**प्रस्तावना :-**

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने विकसित केलेल्या महाडिबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यानी अर्जाची नोंद केल्यानंतर त्यांना अदा करावयाचे लाभ प्रदान करण्याबाबतची ऑनलाईन प्रक्रिया महाडिबीटी एजन्सी मार्फत राबविण्यात आलेली आहे. ही प्रक्रिया प्रगतीत असल्याने, पात्र विद्यार्थ्यास महाविद्यालयात फी भरण्यास अडचणी निर्माण होवू नयेत म्हणून, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात पहिल्या सहामाहीसाठी शिक्षण शुल्क परिक्षा शुल्काच्या ५० % च्या ६० % इतकी रक्कम विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर बंधपत्र घेवून जमा करण्याचा, यासाठी बँकेच्या सल्ल्याने प्रणाली विकसित करण्याचा, तसेच सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी ऑफलाईन पध्दतीने योजनांची देयके अदा करण्यासाठी महाडिबीटी प्रणालीतून काही योजना वगळण्याचा, त्याचबरोबर महाडिबीटी प्रणालीवरील सर्व त्रुटींचे निराकरण करुन सदर प्रणाली अंतिम टप्प्यापर्यंत कार्यन्वित करण्याची कार्यवाही माहिती व तंत्रज्ञान विभागाने एक महिन्यात पूर्ण करण्याचा निर्णय संदर्भीय दिनांक ८डिसेंबर,२०१७ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.

तथापि, माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून महाडीबीटी प्रणालीवर शिष्यवृत्तीच्या योजनांचे लाभ अदा करण्याच्या दृष्टीने, सदर प्रणाली अंतिम टप्प्यापर्यंत कार्यन्वित करण्याची कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नसल्याची बाब निदर्शनास आली. त्यामुळे, या संदर्भात तातडीने उपाययोजना करण्याच्या दृष्टीने, मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १७.१.२०१८ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना (केंद्र पुरस्कृत १००% : शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, निर्वाहभत्ता इ.) व राज्य शासनाची शिक्षण फी परिक्षा फी प्रतिपूर्ती योजना (राज्य पुरस्कृत १००%) या योजनांतर्गत विद्यार्थ्यांना मंजूर करावयाच्या शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परिक्षा फी प्रतिपूर्तीबाबत कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>** :

माहिती व तंत्रज्ञान संचालनालयामार्फत विकसित करण्यात येत असलेली महाडीबीटी ही संगणकीय प्रणाली पूर्णपणे कार्यान्वित झालेली नसल्याने व त्यावर पात्र विद्यार्थ्यांना अनुज्ञेय लाभ अदा करणे शक्य होत नसल्याने, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क,निर्वाहभत्ता इ.) योजना व राज्य शासनाची शिक्षण फी, परिक्षा फी प्रतिपूर्ती योजना या योजनांतर्गत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या अर्जांवर कार्यवाही करणेसाठी पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे :-

(अ) **नुतनीकरण अर्ज** : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या महाईस्कॉल या जुन्या प्रणाली वरील सन २०१६-१७ या वर्षातील महाविद्यालयांमध्ये प्रवेशित व नोंदणीकृत असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे अर्ज, सन २०१७-१८ या वर्षामध्ये संबंधित महाविद्यालयांमार्फत पूर्वीप्रमाणेच महाईस्कॉल प्रणाली वरील कार्यपध्दतीनुसार नुतनी-करण करुन संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी पात्र विद्यार्थ्यांची अनुज्ञेय भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, निर्वाहभत्ता इ.) योजनेची / राज्य शासनाची शिक्षण फी, परिक्षा फी प्रतिपूर्ती योजनेची रक्कम त्यांच्या आधारसंलग्न बॅन्क खात्यावर मंजूर करावी.

(ब) **नवीन अर्ज :** सन २०१७-१८ करीता महाविद्यालयांत ज्या नवीन (Fresh) प्रवेशित विद्यार्थ्यांनी महाडिबीटी प्रणालीवर अर्जांची नोंदणी केलेली आहे असे विद्यार्थी व जे विद्यार्थी तांत्रिक अडचणींमुळे महाडिबीटी प्रणालीवर नोंदणी करु शकले नाहीत, अशा सर्व विद्यार्थ्यांकरीता महाईस्कॉल प्रणालीवर अपलोड करण्यात आलेल्या अर्जाच्या नमुन्यात महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने स्विकारुन ते संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांना सादर केल्यानंतर सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांनी विहीत कार्यपध्दतीनुसार पात्र विद्यार्थ्यांची अनुज्ञेय भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, निर्वाहभत्ता इ.) योजनेची / राज्य शासनाची शिक्षण फी परिक्षा फी प्रतिपूर्ती योजनेची रक्कम त्यांच्या आधारसंलग्न बॅन्क खात्यावर मंजूर करावी.

(१) या करीता, ज्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर केलेले आहेत, तसेच ज्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यानी महाडिबीटी पोर्टलवर अद्यापही ऑनलाईन अर्ज केलेले नाहीत, अशा सन २०१७-१८ मध्ये नव्याने प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी (Fresh Student) महाईस्कॉल पोर्टलवरुन अर्जाचा नमुना (प्रपत्र-क संलग्न) डाऊनलोड करुन, पुर्ण अर्ज भरुन, आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या प्रतीसह महाविद्यालयास ऑफलाईन (मॅन्युअली) पध्दतीने तात्काळ जमा करावेत.

(२) सन २०१७-१८ पासून पात्र विद्यार्थ्यांची अनुज्ञेय शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परिक्षा फी ची अदायगी विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर होणार असल्यामुळे विद्यार्थी व महाविद्यालयांकडून विहीत अटी व शर्ती नमूद केलेल्या सोबतच्या परिशिष्ट "अ" मधील बंधपत्रासह (Indemnity Bond) प्रस्ताव संबंधित महाविद्यालयांमार्फत संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे सादर करावेत.

(३) संबंधित महाविद्यालयाने प्रस्तावासोबत नवीन प्रवेशित आणि नुतनीकरणाच्या पात्र अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची स्वतंत्र माहिती या शासन निर्णयासोबतच्या **"प्रपत्र-ब"** (B Statement) मध्ये प्रमाणित करुन, Hard Copy व Soft Copy संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे तात्काळ सादर करावी.

(४) संबंधित महाविद्यालयाने **"प्रपत्र-ब"** (B Statement) मध्ये शुल्क भरताना ते अद्ययावत (सन २०१७-१८ चे अथवा किमान सन २०१६-१७ च्या) फी-स्ट्रक्चर प्रमाणे भरावे. सदर **"प्रपत्र-ब"** मध्ये संबंधित महाविद्यालयांनी नमूद केलेले शुल्क हे संबंधित विद्यापीठे / फी रेग्युलेटरी ॲथॉरिटी (FRA) यांनी त्या-त्या वर्षी मान्य/मंजूर केलेले असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सदर विवरणपत्रात नमूद केलेले शुल्क हे संबंधित महाविद्यालयांनी संबंधित जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडून देखील मान्य करुन घेणे आवश्यक राहील.

(५) संबंधित महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचा अर्ज व **"प्रपत्र-ब"** (B Statement) सोबत प्रत्येक विद्यार्थ्याच्या पुढील कागदपत्रांच्या प्राचार्यांनी स्वाक्षांकीत (attested ) केलेल्या प्रती सादर कराव्यात.

- (i) विद्यार्थ्याच्या जातीचे प्रमाणपत्र (फक्त नवीन [Fresh]प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता),
- (ii) आवश्यक असेल तेथे जात वैधता प्रमाणपत्र (फक्त नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता)
- (iii) मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा पुरावा / गुणपत्रिका,
- (iv) विद्यार्थ्याची ७५% पेक्षा जास्त उपस्थिती असल्याबाबतचे प्रमाणपत्र,
- (v) उत्पन्नाचा दाखला (भा.स.मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी फक्त नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता)
- (vi) आधारकार्डची प्रत,
- (vii) बॅकेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत,
- (viii) बँकेकडून आधार संलंग्न झाल्याचे स्लिप/पोहच पावती,
- (ix) विहीत नमुन्यातील बंधपत्र (indemnity bond),
- (x) आवश्यकता असेल तेथे रहिवास प्रमाणपत्र (फक्त नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी)
- (xi) आवश्यकता असेल तेथे गॅप प्रमाणपत्र.

(६) संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची पात्रता, कुटुंबाचे उत्पन्न, मागील वर्षी विद्यार्थी उत्तीर्ण असल्याबाबत, तसेच विद्यार्थ्याची उपस्थिती ७५ टक्के असल्याची, त्याचबरोबर महाविद्यालयाची मान्यता, अभ्यासक्रमाची मान्यता, प्रवेश क्षमता या सर्व बाबींची मूळ प्रमाणपत्र, कागदपत्रांवरुन खात्री करण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची असेल. तसेच अभ्यासक्रमासाठी देय

असलेले शुल्क हे नियमानुसार व प्रचलित शासन निर्णयानुसार आहे, याबाबत संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

(७) त्याचप्रमाणे संबंधित विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक, तसेच सदर आधार क्रमांक हा विद्यार्थ्याच्या बँक खात्याशी संलग्न असल्याची खात्री करुन, असे पात्र अर्ज, वर नमूद केलेल्या आवश्यक कागदपत्र व प्रपत्रांसह, संबंधित प्राचार्यांनी संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे मॅन्युअली सादर करावेत.

(८) संबंधित महाविद्यालयाने संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांना दिलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास, संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य हे नियमा नुसार कारवाईस पात्र राहतील.

(९) वरील प्रमाणे महाविद्यालयांकडून नवीन अर्ज तसेच नुतनीकरणाचे अर्ज /प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी विद्यार्थ्याचे जातीचे प्रमाणपत्र, आवश्यक तेथे जातीचे वैधता प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, आवश्यक तेथे अधिवास प्रमाणपत्र, मागील वर्षाचे उत्तीर्ण प्रमाणपत्र, ७५% उपस्थिती व आधार क्रमांक इत्यादीं बाबींची खात्री करुन, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाची विद्यार्थ्यास अनुज्ञेय असलेल्या शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, निर्वाहभत्ता इ.)/ शिक्षण फी, परिक्षा फी ची **संपूर्ण १०० टक्के** रक्कम विद्यार्थ्यांस मंजूर करावी.

(१०) संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी विद्यार्थ्यांचे अर्ज/ प्रस्तावास मंजूरी दिल्यानंतर प्रचलित पध्दतीने देयके तयार करुन ती मॅन्युअली कोषागारात सादर करावीत आणि देयके मंजूर होवून धनादेश प्राप्त झाल्यानंतर ईसीएसव्दारे पात्र विद्यार्थ्याची अनुज्ञेय शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क,निर्वाहभत्ता इ.)/ शिक्षण फी, परिक्षा फी ची रक्कम तात्काळ संबंधित विदयार्थ्याच्या आधार संलग्न बॅन्क खात्यावर जमा करावी.

(११) विद्यार्थ्यांने दिलेल्या बंधपत्रानुसार, विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झालेली महाविद्यालयाच्या फी ची रक्कम, संबंधित विद्यार्थ्यांने कार्यालयीन सात दिवसांच्या आत महाविद्यालयास जमा करावी. शासनातर्फे विद्यार्थ्यांना मिळालेल्या शिक्षण फी, परिक्षा फी ची रक्कम, जी विद्यार्थ्याने महाविद्यालयास भरणे आवश्यक आहे, ती संबंधित विद्यार्थ्यांकडून जमा करुन घेण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची असेल.

(१२) वरील परिच्छेद-(अ) व (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना व राज्य शासनाची शिक्षण फी, परीक्षा फी प्रतिपूर्ती योजनेच्या नुतनीकरणाचे अर्ज हे सामाजिक न्याय विभागाच्या पूर्वीच्या महाईस्कॉल प्रणाली वरुन आणि नवीन (Fresh) विद्यार्थ्यांचे अर्ज व महाडीबीटीवरुन वगळण्यात आलेल्या इतर सर्व योजनांचे अर्ज मॅन्युअली / ऑफलाईन पध्दतीने प्रक्रिया करुन, तरतुदीच्या उपलब्धतेच्या अधिन राहून सर्व संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी निकाली काढावेत.

(१३) सर्व संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी वरील प्रमाणे पात्र असलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची अनुज्ञेय असलेली भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, निर्वाहभत्ता इ.) योजनेची / राज्य शासनाची शिक्षण फी, परिक्षा फी प्रतिपूर्ती योजनेची रक्कम ही, **अनुज्ञेय असलेल्या अभ्यासक्रमांसाठीच** अदा करावी.

२. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता संदर्भाधीन दिनांक ८.१२.२०१७ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मधील योजनांसह सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या खालील योजना सुध्दा महाडीबीटी पोर्टलवरुन वगळण्यात येवून, सर्व शिष्यवृत्तीच्या योजना ऑफलाईन मॅन्युअली पध्दतीने राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(१) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना (केंद्र पुरस्कृत १००%)

(२) राज्य शासनाची मॅट्रीकोत्तर शिक्षण फी परिक्षा फी प्रतिपूर्ती योजना (राज्यपुरस्कृत १००%)

(३) अनुसूचित जातीच्या इ.९वी व इ. १० वी च्या मुलामुलींसाठी भारत सरकार मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती (केंद्र पुरस्कृत १००%)

(४) अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांसाठी मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती (केंद्र पुरस्कृत)

३. सन २०१७-१८ मध्ये महाडिबीटी प्रणाली संपूर्णपणे कार्यान्वीत झालेली नसल्यामुळे पी.एफ.एम.एस. गेटवेमार्फत शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची अट शिथील करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. तसेच संदर्भीय दिनांक ७ ऑगस्ट,२०१७ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद ७ मधील आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांना “आहंरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात आलेली बाब वगळण्यात येत असून, यापूर्वी त्या-त्या योजनांकरीता विहीत केलेले आहंरण व संवितरण अधिकारी सन २०१७-१८ करीता कायम राहतील.

५. वरील प्रमाणे विहीत करण्यात आलेली कार्यपध्दती ही फक्त सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठीच लागू राहील.

६. सदरहू शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०१२९१७५६२७७२२२ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2018.01.29 18:12:54 +05'30'

**(दि.रा.डिंगळे)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (सा.न्या.व वि.स.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) मा.विधान परिषद/विधानसभा सदस्य, विधानभवन, मुंबई
६) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७) अमुस, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
११) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
१५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१६) आयुक्त,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे.
१७) संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२०) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे
२१) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
२२) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक/उच्च माध्यमिक)
२३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेय/लेखा परिक्षा) महाराष्ट्र ½,मुंबई/नागपूर.
२४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२६) सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण.
२७) निवडनस्ती (का.शिक्षण-१)

# "परिशिष्ट-अ"

(शासन निर्णय क्र. इबीसी २०१७/प्र.क्र.५२४ /शिक्षण -१, दिनांक २९ जानेवारी,२०१८ चे सहपत्र)

## सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इ. ची अनुज्ञेय रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँन्क खात्यावर मिळण्यासाठी विद्यार्थी व पालकाने द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond)

### (अ) महाविद्यालयाने द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond)

(I) श्री. -------------------------------------------------------- या अर्जदाराने सोबतच्या बंधपत्रात (Indemnity Bond) नमूद केलेली सर्व माहिती, त्याच्या कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न, तो सध्या शिकत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती, शैक्षणिक माहिती, त्याचे वसतिगृह, वसतिगृहा बाहेर राहण्याची माहिती शुल्करचना, जातीचे प्रमाणपत्र इ. तपशिल त्याच्या मुळ कागदपत्रांवरुन पूर्णपणे तपासण्यात आला असून, अर्जात नमूद केलेला तपशिल बरोबर आहे. त्यानुसार, मी, श्री / श्रीमती ---------------------------------------------------------- ( प्राचार्याचे नाव ) -----------------------------------------------------------------------या शैक्षणिक संस्थेच्या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत असुन, त्या अधिकारात **उपरोक्त** विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क इतर शुल्क मंजूर करण्याकरीता शिफारस करीत आहे.

(II) मी निम्नस्वाक्षरीत हमी देतो की, अर्जदाराची शिक्षण शुल्क व इतर शुल्काची रक्कम जी महाविद्यालयाकडे सुपूर्द केलेली आहे, ती ज्या प्रयोजनासाठी दिलेली आहे, त्या विशिष्ट प्रयोजनासाठी त्याचा विनियोग करीन आणि त्याबाबीचे हिशोब ज्या प्राधिकाऱ्याने ही तरतूद सुपूर्द केलेली आहे, त्या प्राधिकाऱ्याकडे नियमितपणे पाठवेन. विद्यार्थी महाविद्यालय सोडून गेल्यास किंवा त्याने विनापरवानगी अभ्यासक्रमात बदल केल्यास किंवा अन्य कोणत्याही अनियमिततेमुळे त्याचा प्रवेश रद्द झाल्यास, त्यास मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्ती / शिक्षण फी, परिक्षा फी व इतर शुल्काची रक्कम सरकारी लेख्यात जमा झाल्याशिवाय त्याचा शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखला जारी करणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य या नात्याने माझ्याकडे राहील.

(III) विद्यार्थ्याच्या अर्जामध्ये नमूद केलेली माहिती, अर्जदाराने दिलेल्या मुळ कागदपत्राचे आधारे मी तपासलेली आहे. तसेच अर्जदारानी सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती तपासलेल्या असून सादर केलेल्या कागदपत्रामध्ये कोणताही बदल, खाडाखोड, दुरुस्ती वा फेरफार आढळून आलेला नाही.

(IV) मी निम्नस्वाक्षरीत प्रमाणित करतो की, अर्जदार हा आमचे महाविद्यालयामधील नियमित विद्यार्थी आहे. त्याने कोणत्याही अन्य महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेला नाही, तसेच त्याची सरासरी उपस्थिती ७५% पेक्षा अधिक आहे. तसेच सदर विद्यार्थ्याकडून महाविद्यालयाने कोणतेही शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर अनुज्ञेय शुल्क घेतलेले नाही.

(V) आमचे महाविद्यालय हे मान्यता प्राप्त आहे, ते अनुदानित / विनाअनुदानित आहे, मान्य झालेले अभ्यासक्रम हे संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी मान्यता दिलेले आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता ही सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या मान्यतेनुसारच असुन, त्या प्रवेश क्षमतेच्या अधिन राहून मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित सक्षम कार्यालयास फॉरवर्ड केले आहेत. त्यांची शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क व इतर शुल्क सुध्दा, संबंधित सक्षम प्राधिकारी / विद्यापीठ यांनी मान्य केल्याप्रमाणेच असून ती अवास्तव किंवा अवाजवी नाहीत. शासन / विद्यापीठ / सक्षम प्राधिकारी यांचे प्रचलित नियम व अटी यांचे पालन करुन व त्यामधील नियम, अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यार्थ्याचा अर्ज योग्य व नियमानुसार असून, त्याची शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्काची देय रक्कम, संबधितांचे आधार संलग्न बॅक खात्यावर जमा होणेसाठी शिफारस करण्यात येत आहे. त्यामध्ये अनियमितता उणीवा व गैरप्रकार झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही महाविद्यालयाची असेल.

जावक क्रमांक ---------------
दिनांक -----------------
ठिकाण --------------------

प्राचार्याची स्वाक्षरी-------------------------------------------
संपूर्ण नाव -------------------------------------------
महाविद्यालयाचा शिक्का

**टिप :- प्रस्तावासोबत विद्यार्थी/पालकांनी व महाविद्यालयांनी द्यावयाचे बंधपत्र प्राचार्यांनी एकत्रितच संलग्न करुन द्यावयाचे आहे.**

## (ब) विद्यार्थी व पालकांनी द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond):-

१) मी / आम्ही खाली सही करणार / करणारे प्रतिज्ञापन करतो की, शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत. अर्जात वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती पूर्णपणे सत्य आहे. सदरची माहिती खोटी अथवा अपुरी आढळल्यास भारतीय दंडविधाना प्रमाणे होणाऱ्या दंडास / शिक्षेस मी / आम्ही पात्र आहे / आहोत. अर्जात नमूद केलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती वा निवेदन चुकीचे आढळून आल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला निर्णय अंतिम असेल व तो माझ्यावर / आम्हावर बंधनकारक असेल, अशी मी / आम्ही हमी देतो. जर शिष्यवृत्तीची, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अनुज्ञेय रक्कमेपेक्षा अधिक मिळाली तर मी / आम्ही ती शासनास जमा करु, अशी जास्तीची अथवा अन्य कारणामुळे वसूल करण्यात येणारी रक्कम मी / आम्ही पूर्णपणे शासनास परत करण्याची हमी देतो.

२) माझ्या कुटुंबाच्या उत्पन्नाची व जातीची अर्जात नमूद केलेली माहिती खोटी आढळल्यास माझ्या / माझ्या पाल्याच्या विरुध्द होणाऱ्या कारवाईस मी / आम्ही स्वत: जबाबदार राहू.

३) मी अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे, मी सक्षम अधिकाऱ्याकडून / प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केलेली असून, ती कागदपत्रे खरी असून योग्य मार्गाने मिळविलेली आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार / दुरुस्ती / बदल केलेला नाही. सदरील कागदपत्रे, प्रमाणपत्रे खोटी अथवा नकली नाहीत हे मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो. अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे, प्रमाणपत्रे खोटे अथवा बनावट आढळल्यास त्यास मी / आम्ही पुर्णत: जबाबदार असून त्यासाठी भारतीय दंड विधान कायदा कलम १९९ व २०० नुसार लागू होणाऱ्या शिक्षेस मी/आम्ही पात्र राहू, याची मला/आम्हाला पुर्ण जाणीव आहे.

४) सन २०१७-१८ या वर्षाची शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्काची रक्कम माझ्या आधार संलग्न बॅन्क खात्यावर जमा होताच, त्यापैकी महाविद्यालयास देय असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम सात दिवसात महाविद्यालयात जमा करुन त्याची रितसर पावती प्राप्त करुन घेण्याची माझी / आमची जबाबदारी असेल. शुल्क महाविद्यालयास जमा न केल्याने भविष्यात उदभवणा-या परिणामास मी / आम्ही वैयक्तीक जबाबदार असु असे प्रतिज्ञापुर्वक हमीपत्र / बंधपत्र मी / आम्ही सादर करीत आहोत.

ठिकाण :

दिनांक :

( अर्जदाराच्या वडीलांची / पालकाची सही व पुर्ण नाव )  ( अर्जदाराची सही व पूर्ण नाव )

## B - STATEMENT (FOR YEAR 2017-18)

| NAME of the COLLEGE / INSTITUTION | Name of Parent Institution/ Body/ Sanstha | Mahaeschol User ID | Address and Contact details of College | Bank Name | Bank Branch Name | Bank Account No. | Cuurent Month | Current Year | Financial Year | Name of Principal | Name of College Clerk |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

| Details of Students | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | Details of Scholarship sanctioned | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No | Name of the Candidate/ Student in full | | | GRN No. | Mahaeschol Application ID (if applicable) | MahaDBT Application ID (if applicable) | Email | Mobile No. | Caste | Sub-caste | Gender (Male/Female) | Fresh / Renewal | Current Class in which Studying | Current Course Name | University Name | Name of last Examination passed | Year of last examination passed | Percentage of marks obtained during last Exam. only | Admission Date | Exam Date | Whether Hosteller or Day Scholar | Date of joining the College (if applicable) | Date of joining the Hostal (if applicable) | Amount of annual income of parents or | Aadhar No. | Aadhar Seeded Bank Account Number | Bank Branch Name | Bank IFSC Code | Period of Maintenance Allowance covered in Months | Amount of Maintenance Allowance in Rs. | Amount Paid by Student in Rs. | Amount of Tution Fees in Rs. | Amount of Examination Fees in Rs. | Amount of Other Fees in Rs. | Total Amount Sanctioned in Rs. |
| | Surname | First | Middle | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावामध्ये समाविष्ट असलेले विद्यार्थी हे सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयामध्ये नियमित विद्यार्थी आहेत. उपरोक्त माहितीमध्ये विसंगती आढळल्यास किंवा अदा केलेली रक्कम ही निकषानुसार नसल्यास, होणारी वसुलपात्र रक्कम व्याजासह परत करण्याची जबाबदारी माझी असेल याची मला जाणीव असून सादर केलेली माहिती ही अचूक आहे. याबाबत मी प्रमाणित करत आहे.

**प्राचार्यांची स्वाक्षरी-**
**प्राचार्यांचे नाव-**
**स्थळ-**
**दिनांक- / /2018**
**शिक्का-**

"प्रपत्र क"

# नोंदणी अर्जाचा नमुना

**(भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व राज्य शासनाची शिक्षण फी, परीक्षा फी प्रतिपूर्ती योजनेकरीता)**

**(शासन निर्णय क्र. इबीसी २०१७/प्र.क्र.५२४ /शिक्षण -१, दिनांक २९ जानेवारी,२०१८ चे सहपत्र)**

| विद्यार्थ्याचा पासपोर्ट आकराचा फोटो |
|---|

अर्ज क्रमांक ------------------------

**अर्जदाराची इयत्ता दहावीची माहिती**

मॅट्रिक बोर्ड ------------------------ ----------------------------------

| उत्तीर्ण वर्ष | दहावीचा बैठक क्रमांक | दहावीतील गुण (टक्केवारी) |
|---|---|---|
| | | |

**अर्जदाराची माहिती**

अर्जदाराचे संपुर्ण नांव :----------------------------------------------------------------------

अर्जदाराच्या आईचे नांव :----------------------------------------------------------------------

अर्जदाराची जन्मतारीख :--------------------- लिंग ( ✔ ) :- पुरुष / स्त्री

महाराष्ट्र राज्याचा निवासी आहे काय ( ✔ ) :- होय / नाही

वैवाहीक स्थिती ( ✔ ) :- विवाहित / अविवाहित

विवाहीत असल्यास पतीचे नाव :----------------------------------------------------------------

जात :---------------------------------------- उपजात :----------------------------------------

प्रवर्ग ( ✔ ) :- अनुसूचित जाती /विजा/भज/विमाप्र/इमाव

अर्जदार अनाथ आहे काय ( ✔ ):-होय / नाही

अर्जदार अपंग आहे काय ( ✔ ):-होय / नाही असल्यास अपंगत्व प्रकार व प्रमाण :--------------

अर्जदाराच्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न :-------------------------------------------------------

अर्जदार पगारदार आहे काय ( ✔ ) :- होय / नाही असल्यास अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न :-----------

आधार क्रमांक :- ---------------------------------------------------------------------------

आधार क्रमांक बॅक खात्याशी संलग्न आहे काय ( ✔ ) :- होय / नाही असल्यास सोबत पुरावा जोडण्यात यावा

**अर्जदाराचा शैक्षणिक तपशिल**

| शैक्षणिक वर्ष | संस्थेचे नांव | अभ्यास क्रम / कोर्स | कोर्स वर्ष | टक्केवारी | निकाल |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**शैक्षणिक संस्थेचा तपशिल**

प्रवेश घेतलेल्या शाळा / महाविद्यालय / संस्थेचे नांव :------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------

कोर्सचे नांव :------------------------------------------------------------------------------------

कोर्सचे वर्ष :------------------------------- CAP नंबर :------------------------------------------

EID क्रमांक :------------------------------------- शैक्षणिक वर्ष :----------------------------

विषय :------------------------------------------------------------------------------------------

महाविद्यालय प्रवेश क्रमांक :------------------------------ प्रवेशाची तारीख :------------------------

कॉलेज शुल्क अदा आहे काय :------------------------ असल्यास किती फी अदा :---------------

फि पावती क्रमांक :-------------------------------------फि पावती तारीख :------------------------

महाविद्यालयाच्या मान्यतेचा प्रकार :-------------------------------------------------------------

डिप्लोमा नंतर प्रवेश आहे काय (✔):-होय / नाही

**अर्जदाराचा संपर्क तपशिल**

सध्याचा पत्रव्यवहाराचा पत्ता :-----------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------

कायमचा पत्ता :------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------

पिन कोड :- ---------------------------------

दुरध्वनी क्र. :------------------------------------ मोबाईल क्र. :-----------------------------------

## अर्जदाराच्या पालकाचा तपशिल

वडिलाचे/ पालकाचे संपुर्ण नाव :-------------------------------------------------------------------

वडिलाचे/ पालकाचा संपुर्ण पत्ता :-------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

वय :--------- अर्जदाराशी नाते :---------------------- वडिलाचे/ पालकाचे व्यवसाय :------------

अर्जदाराचे वडील हयात आहेत काय (✔) :- होय / नाही

अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न :---------------------------------------------------------

विवाहीत असल्यास पतीचे / पत्नीचे उत्पन्न :-------------------------------------------------

## वसतिगृहाची माहिती

वसतिगृहामध्ये रहात आहात काय (✔) :- होय / नाही

वसतिगृह लागू आहे काय (✔) :- होय / नाही   रात्र शाळेत शिकत आहात काय (✔) :- होय / नाही

वसतिगृहाचा प्रकार (✔) : शासकीय / अनुदानित / महाविद्यालयाने / खाजगी

वसतीगृह प्रवेश दिनांक :--------------------

मेस सेवा उपलब्ध आहे काय (✔) :- होय / नाही   प्रतिमहा भाडे :--------------------------

वसतिगृह गृहपाल / गृहप्रमुख / घरमालकाचे नांव व पत्ता :--------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------------

## अर्जदाराचे दस्तावेज माहिती

जात प्रमाणपत्र क्रमांक :---------------------- कोणत्या कार्यालयाकडून प्राप्त झाले :--------------

---------------------------------------------------------------------------------------------------

जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक :----------------- कोणत्या कार्यालयाकडून प्राप्त झाले :-------------

---------------------------------------------------------------------------------------------------

उत्पन्नाचा दाखला क्रमांक :-------------------- कोणत्या कार्यालयाकडून प्राप्त झाले :-------------

---------------------------------------------------------------------------------------------------

## अर्जदाराच्या बॅंके अकाउंटचा तपशिल

बॅंकेचे नांव :-----------------------------------------------------------------------------

शाखेचे नांव :-----------------------------------------------------------------------------

IFSC code :------------------------------------ MICR code:-------------------------

खाते क्रमांक :----------------------------------------------------------------

## अर्जा सोबत जोडलेले दस्तावेज

१)

२)

३)

४)

५)

*सुचना :-*

- *वरील अर्जाची हार्ड कॉपी ( छापील प्रत ) सोबत जोडलेल्या हमीपत्रासह महाविद्यालयात ८ दिवसाच्या आत सादर करणे बंधनकारक आहे.*
- *अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, मागील वर्षीची गुणपत्रिका यांच्या सत्यप्रती, वडीत हयात नसल्यास त्यांच्या मृत्यूचा दाखला जोडावा, आई व वडिल दोघेही हयात नसल्यास पालकांच्या उत्पन्नाचा दाखला, शैक्षणिक वर्षात गॅप असल्यास तहसीलदारासमोर केलेले प्रतिज्ञापत्र, मुलीचे बाबतीत विवाहीत असल्यास पतीच्या उत्पन्नाचा दाखला, आधारकार्ड प्रत जोडावी, बॅकांच्या पासबुकची प्रत किंवा रद्द केलेला चेक, मागील शाळा / महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्याची प्रत हि कागदपत्रे जोडावीत.*
- *बॅक खाते क्रमांक आधार कार्ड क्रमांकशी संलग्न व मोबाईल क्रमांक लिहणे अत्यंत महत्वाचे व अनिवार्य आहे जेणेकरुन आपली शिष्यवृत्ती योग्य खात्यावर जमा होईल आणि आपणास वेळोवेळी आपल्या अर्जाची स्थिती एस.एम.एस व्दारे समजेल.*

---

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सातारा
यांचे कार्यालय
समाज कल्याण संकुल,409/9 ब,सदरबझार सातारा 415001

दुरध्वनी क्र.02162-234246 Email-sdswosatara@gmail.com


क्र.सआसकआ/भासशि/कार्यशाळा/17.18/ ६५८
दिनांक -31.01.2018.

मा.प्राचार्य,

-----------------------------------

-----------------------------------

विषय - दि.1.02.2018 रोजी भारत सरकार शिष्यवृत्ती/शिक्षण फि परिक्षा फी या योजनेसंदर्भात आयोजित केलेल्या कार्यशाळेस उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ - दि.31.01.18 रोजीची मा.आयुक्त,समाज कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांनी आयोजित केलेली व्हिडीओ कॉन्फरन्स.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून सन 2016-17 या वर्षाचे भारत सरकार शिष्यवृत्तीचे अर्ज रिनेव्हल करणेसाठी दि.1 फेब्रुवारी 2018 ते दि.7 फेब्रुवारी 2018 इतका कालावधी देण्यात आलेला आहे त्याअनुषंगाने महाविदयालय स्तरावरील अर्ज रिनेव्हल करणेसंदर्भात मार्गदर्शन करणेकामी दि.1.02.18 रोजी खालील नमुद केलेनुसार तालुक्यांनी उपस्थित राहवयाचे आहे.आपले महाविद्यालयातील शिष्यवृत्तीचे काम पाहणारे संबधित क्लार्क नी उपस्थित राहवयाचे आहे.अनुपस्थित राहणाऱ्या महाविदयालयांना येणाऱ्या अडचणी संदर्भात त्या महाविदयालयाचे प्रचार्य व संबधित शिष्यवृत्तीचे काम बघणारे कर्मचारी जबाबदार राहतील याची दखल घ्यावी.

| अ.क्र. | तालुके | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| 1 | पाटण,फलटण,खंडाळा, महाबळेश्वर,खटाव,माण | सकाळी 11 ते 1 | धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स सातारा |
| 2 | सातारा,कोरेगाव,वाई,कराड,जावळी | दुपारी 2 ते 5 | |

आपला,

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण सातारा.

**प्रत माहीतीस्तव सविनय सादर-**

**1.मा.प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण पुणे विभाग पुणे.**

F:\GOI scholarship\Sch 2017-18\Letter

# सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण सातारा
## यांचे कार्यालय

**समाज कल्याण संकुल, ४०९/९ ब, सदरबझार सातारा ४१५ ००१**

दूरध्वनी क्र.. ०२१६२-२३४२४६ E mail- sdswosatara@gmail.com

**प्रथम प्राधान्य**

जा.क्र. सआसकसा/महाईस्कॉल/प्रणाली बंद/ २०१८-१९/ 2880
दिनांक – ०३ सप्टेंबर २०१८.

प्रति,
मा. प्राचार्य
______________(सर्व)
सातारा.

**विषय :- <u>महाईस्कॉल ही जुनी संगणक प्रणाली येत्या काही दिवसांत बंद करण्यात येणार असल्याने महाईस्कॉल संगणक प्रणालीशी संबंधीत सर्व कामकाज तातडीने करण्याबाबत...</u>**

संदर्भ :- शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१८/ प्र.क्र. १४३/ शिक्षण, दि.०१ सप्टेंबर २०१८.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय शासन पत्रानुसार माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परिक्षा फी प्रदानासंदर्भात नवी प्रणाली / पोर्टल विकसित केलेले आहे. त्यामुळे येत्या काहीच दिवसांत **<u>महाईस्कॉल ही जुनी संगणक प्रणाली बंद करण्यात येत आहे.</u>** असे असले तरी महाविदयालयांचे शिक्षण फी, परिक्षा फी व विदयार्थ्यांचे शिष्यवृत्तींचे अर्ज निकाली काढण्यासाठी मात्र पुढील तीन दिवसांची अर्थात दिनांक ०४ सप्टेंबर २०१८ पर्यंतचीच कालमर्यादा घालून देण्यात आलेली आहे.

त्यामुळे ज्या महाविदयालयांचे शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परिक्षा फी चे अर्ज कार्यालयास फॉरवर्ड करावयाचे राहिले असतील त्यांनी अर्ज तात्काळ फॉरवर्ड करुन तपासणीसाठी स्टेंटमेंट बीसह या कार्यालयास सादर करावे. विलंबामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

सोबत : विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे आदेश.

आपला विश्वासु,

(व्ही. आर. गायकवाड)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण सातारा.

१) मा. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे.

दि.१ ऑक्टोबर २०१८

# महाराष्ट्र शासन

तातडीचे/ई-मलद्वारे

क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र. १४३/शिक्षण
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,
मंत्रालय, मुंबई
दिनांक : ०१/९/२०१८

प्रति,

१. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, (सर्व)
३. सहायक आयुक्त, समाजकल्याण, (सर्व)

विषय- महाईस्कॉल ही जुनी संगणक प्रणाली येत्या काही दिवसांत बंद करण्यात येणार असल्याने महाईस्कॉल संगणक प्रणालीशी संबंधित सर्व कामकाज तातडीने करण्याबाबत.

महोदय,

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने विकसित केलेल्या महाडिबीटी पोर्टलवर मॅट्रीकपुर्व व मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परिक्षा फी प्रदान करणेकरीता शासनाकडून महाडिबीटी पोर्टल विकसित करण्यात आले असुन त्याची अंमलबजावणी करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

त्यामुळे मॅट्रीकपुर्व व मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परिक्षा फी प्रदान करणेबाबत राबविण्यात येत असलेली महाईस्कॉल ही जुनी संगणक प्रणाली येत्या काही दिवसांत बंद करण्यात येणार आहे. सबब, महाईस्कॉल संगणक प्रणालीवर मॅट्रीकपुर्व व मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी व परिक्षा फी प्रदान करणेबाबत आपले कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जांची प्रिंट काढून ठेवणे, प्राप्त अर्जांचे बील जनरेट करणे इ. महाईस्कॉल संगणक प्रणालीशी निगडीत असलेली सर्व कार्यवाही तीन दिवसांचे आत करण्यात यावी. याप्रमाणे कार्यवाही न केल्याने भविष्यात काही अडचणी उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांची राहील.

जे प्रकरण कागदपत्रांअभावी प्रलंबित आहेत त्यांना प्रलंबित न ठेवता त्यांना अमान्य करावे. तसेच महाविद्यालय स्तरावर जे प्रलंबित आहेत ते सुध्दा जर महाईस्कॉलवर अजूनही पाठविले नसतील तर ते अपात्र असे ग्राहय धरुन त्यांना सुध्दा प्रलंबित प्रकरणांच्या यादीमधून वगळावे. सन २०१६-१७ पूर्वीचे एकही अर्ज प्रलंबित राहणार नाहीत अशी कार्यवाही तीन दिवसात पूर्ण करावी. फक्त सन २०१७-१८ चे शैक्षणिक वर्षाचे अर्ज ऑफलाईन स्विकारुन ते सुध्दा पुढील १५ दिवसात सर्व अर्ज निकाली काढावेत. नवीन DBT सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून सुरु झाल्यानंतर कोणतेही जुने अर्ज प्रलंबित राहिल्यास त्यासाठी संबंधित संस्था / सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण हे जबाबदार राहतील. यासाठी शासन जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

आपला,

( भा.र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय.

दुरध्वनी क्र.02162-234246 Email-sdswosatara@gmail.com.

क्र.सआसकसा/भासशि/कार्यशाळा/महाईस्कॉलप्रलंबित/2018-19/3289
दिनांक : 4.10.2018

प्रति,
मा.प्राचार्य,
------------------
------------------
------------------

विषय – सन 2016-17 व त्यापुर्वीचे अनुसूचित जातीच्या विदयार्थ्यांच्या महाविदयालयाकडे प्रलंबित राहिलेले भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व राज्यशासनाची शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती योजनेचे अर्ज निकाली काढणेसंदर्भात.

संदर्भ – 1.मा.आयुक्त,समाज कल्याण पुणे यांचे कार्यालयाकडील पत्र.क्र.सकआ/शिक्षण/का-4क/प्रलंबित अर्ज/2018-19/3424/20.09.2018 चे पत्र.
2.या कार्यालयाकडीलपत्र क्र.3129 दि.21.09.2018 चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते कि,आपल्या महाविदयालयात सन 2011-12 ते 2016-17 या कालावधीमध्ये अनुसूचित जातीच्या विदयार्थ्यांनी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती,शिक्षण फि परिक्षा फीचे अर्ज ऑनलॉईन भरलेले आहेत,अशा विदयार्थ्यांचे अर्ज अदयापही आपल्या महाविदयालय स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे.आपणास वारंवार आवाहन करून तसेच आपले आपल्या महाविदयालयास लेखी कळवूनही आपल्या स्तरावर अर्ज प्रलंबित आहेत.सदरचे प्रलंबित अर्ज निकाली काढणेच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणीच्या संदर्भात चर्चा करणेच्या दृष्टिने या कार्यालयामार्फत 1 दिवसीय कार्यशाळा दिनांक 10.10.2018 आयोजीत करणेत आलेली आहे.तरी खालील दिलेल्या वेळापत्रकानुसार संबधित तालुक्यांनी शिष्यवृत्तीचे कामकाज पाहणाऱ्या क्लार्क ने उपस्थित राहवयाचे आहे.ज्या महाविदयालयाचे क्लार्क उपस्थित राहणार नाहीत.त्यांचे अनुपस्थितीबाबत अहवाल वरिष्ठ कार्यालयास कळविणेत येईल.तसेच विहीत मुदतीत ऑनलाईन असलेले अर्ज फॉरवर्ड न केल्यास सदर अर्ज रदद समजण्यात येतील व यानंतर अशा अर्जाची दखल घेतली जाणार नाही व याची जबाबदारी संबधित महाविदयालयाचे शिष्यवृत्ती चे कामकाज पाहणारे क्लार्क व प्राचार्य यांचेवर राहील याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

आपला,
(सही)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण सातारा.

प्रत -1. प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत-2. मा. प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, सातारा. यांनी माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सविनय सादर.

# वेळापत्रक

| अ.क्र. | दिनांक | तालुक्यांची नावे | कार्यशाळेचे ठिकाण | वेळ | संबधित कॉलेजमध्ये कार्यरत असणारे क्लार्क चा संपर्काचा दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 10.10.2018 | सातारा,खटाव,माण, फलटण,कराड,पाटण | कर्मवीर भाऊराव पाटील इंजिनिअरिंग कॉलेज,सातारा | सकाळी 11 ते दुपारी 2 | भोईटे सर 9834620430 |
| | | कोरेगाव,खंडाळा,वाई ,मश्वर,जावळी | | दुपारी 2 ते सायं.5 | |

उपरोक्त नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार संबधित महाविदयालयातील क्लार्कने वेळेत उपस्थित रहावयाचे आहे.

सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण सातारा.

महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय.

दुरध्वनी क्र.02162-234246 Email-sdswosatara@gmail.com.

क्र.सआसकसा/भासशि/शिक्षण/2018.19/ ५३७

दिनांक - 25.02.2019.

प्रति,

मा. प्राचार्य

सर्व महाविद्यालये

विषय :- सन 2018.19 या शैक्षणिक वर्षातील महाडिबीटी पोर्टल वरील अनु.जातीचे शिष्यवृती /शिक्षण शुल्क परिक्षा प्रलंबित अर्जाबाबत....

संदर्भ :- 1. मा.मुख्य सविव यांचे अध्यक्षतेखाली दि.29.12.2018, दि.10.1.2019, दि.19.1.2019 व दि.5.2.2019 रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये दिलेले निर्देश.

2. मा.आयुक्त,समाज कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.सकआ/शिक्षण/डिबीटी शिष्यवृत्ती/2018-19/432 दि.22.02.2019 रोजीचे पत्र.

महोदय,

सन 2018.19 या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाच्या सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी डीबीटी (Mahadbt) पोर्टल दिनांक 01.10.2018 पासून नव्याने कार्यान्वीत झाली असून https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळाचा वापर करुन अनुसूचित जाती प्रवर्गातील विदयार्थ्यांकरीता सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती / फ्रिशिप योजनांकरिता ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत केले जात आहेत. सदर अर्ज संबंधित जिल्हातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडून ऑनलाईन मान्यता देण्यात येत आहेत.

याबाबत सदर योजनांचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्याकरीता अधिक गती यावी म्हणून यापुर्वीच आपणांस वेळोवेळी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेमार्फत पत्राव्दार, व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे, जिल्हास्तर तसेच प्रादेशिक स्तरावरील बैठकांमध्ये वारंवार सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

**1.<u>सन 2018-19 या शैक्षणिक वर्षातील महाविद्यालय स्तरावरील अनु.जातीचे शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क परिक्षा शुल्काच्या प्रलंबित अर्जाबाबत</u>**

याअनुषंगाने मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी सदर योजनेचा आढावा व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे घेतला असून, सदयस्थितीत जिल्हा कार्यालयाकडे अनु.जातीचे सुमारे 26,878 अर्ज तसेच महाविदयालय स्तरावर अदयापही सुमारे 70,325 अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. तेव्हा महाविदयालय स्तरावरील प्रलंबित अर्ज फॉरवर्ड करुन अर्ज तात्काळ निकाली काढावेत.

**2.<u>महाडिबीटी पोर्टल वरील अनु.जातीचे शिष्यवृत्ती / शिक्षण शुल्क परिक्षा शुल्काचे विदयार्थ्यांनी / महाविद्यालयांनी अर्ज मंजुर होण्यापुर्वी रद्द (Cancel) केलेल्या अर्जाबाबत</u>**

त्याचप्रमाणे अनसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी अथवा महाविद्यालयाने अर्ज मंजू होण्यापुर्वी त्यांच्या स्तरावरुन सुमारे 97,788 अर्ज रद्य (Cancel) केले आहेत. सदर रद्द केलेल्या अर्जापैकी पात्र असलेल्या अर्जांची त्वरीत त्रुटी पुर्तता करुन असे अर्ज पुनश्च ऑनलाईन मान्य करावेत व संबंधित सहाय्यक आयुक्त समाज कल्याण लॉगीनवर फॉरवर्ड करावेत.

**3.<u>महाडिबीटी पोर्टल वरील मान्य झालेल्या अर्जांची यशस्वी वितरण (Redemption) प्रक्रिया करणेबाबत</u>**

सदर पोर्टलवर मान्य झालेली अर्जांची अदायगीची प्रक्रिया यशस्वी होणेकरिता विदयार्थ्यांच्याच लॉगीनमधून रिडम्शन प्रक्रिया (Redemption) करणे अत्यावश्यक आहे. सदर ऑनलाईन प्रक्रिया पुर्ण न केल्यास मान्य झालेली विदयार्थी व महाविदयालयाची शिष्यवृत्तीची रक्कम वितरीत होणार नसल्याची बाब आपल्यास्तरावरुन विदयार्थ्यापर्यंत परिपत्रके, नोटीसा, तसेच प्लेक्स बोर्ड लावून व्यापक प्रसिध्दी करण्यात यावीत . तसेच याबाबतच्या सुचना आपल्या महाविदयालयातील सर्व विदयार्थी संघटनामार्फत विदयार्थ्यांपर्यत कळविण्यात याव्यात. "रिडम्शन व्हाऊचर" जनरेट झाले असून देखील रिडम्शन प्रक्रिया न केलेल्या विदयार्थ्यांवर महाविदयालयाने त्यांच्यास्तरावर योग्य ती कारवाई करावी.

**4.महाडीबीटी पोर्टलव्दारे शिष्यवृत्ती /शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजेनसाठी अर्ज करण्याची अंतिम दिनांकाबाबत -**

महाडीबीटी पोर्टलव्दारे शिष्यवृत्ती /शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजेनसाठी अर्ज करण्याची अंतिम दि 28.02.2019 आहे.तरी सर्व विदयार्थ्यांनी अंतिम दिनांक 28.02.2019 पर्यंत परिपुर्ण ऑनलाईन अर्जांची संपुर्ण प्रक्रिया पुर्ण करून महाविदयालयाकडे अर्ज फॉरवर्ड करावेत .त्याच प्रमाणे महाविदयालयाकडुन समाज कल्याण यांच्या कडे ऑनलाईन अर्ज फॉरवर्ड करावयाची अंतिम दिनांक 4.03.2019 आहे.

त्याचप्रमाणे सदर नमुद केलेल्या अंतिम मुदतीनंतर विदयार्थी तसेच महाविदयालय स्तरावरिल प्रलंबित असलेले अर्ज हे विहीत वेळेत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांना फॉरवर्ड न केलेले अर्ज रदद पात्र (रिजेक्टेड) ठरविण्यात येतील याची सर्वांनी गांभिर्याने नोंद घ्यावी .त्यामुळे उपरोक्त दोन्ही बाबींमध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही विदयार्थी व संबधित महाविदयालयाचे प्राचार्य यांची असेल याची सर्व विदयार्थ्यांनी व महाविदयालयांच्या प्राचार्यांनी नोंद घ्यावी.त्याचप्रमाणे याबाबत विदयार्थ्यांना आपल्यास्तरावरून योग्य त्या सुचना योग्य त्या सुचना निर्गमित कराव्यात.

याबाबत मा.मुख्य सचिव, महोदय यांनी दिलेल्या उपरोक्त सुचनांचे पालन करुन सदर योजनांच्या शिष्यवृत्तीची अदायगी शिघ्रगतीनी करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

सदर महाडिबीटी पोर्टवरील प्रलंबित असलेल्या अर्जाबाबत मा.मुख्य सचिव महोदय, महाराष्ट्र शासन दि.28.2.2019 रोजी व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे प्रत्यक्ष जिल्हानिहाय आढावा घेणार आहेत. प्रलंबित अर्ज निकाली काढणेबाबत कोणत्याही स्वरुपाचा हलगर्जीपणा, टाळाटाळ अथवा दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आल्यास व त्यामुळे अनूसूचित जातीचे विदयार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविदयालयाच्या प्राचार्यांची राहील याची महाविदयालयाच्या प्राचार्यानी गंभीर्याने नोंद घ्यावी.

आपला,

सहाय्यक आयुक्त,
समाजकल्याण सातारा

प्रत माहीतीस्तव-

1. मा.जिल्हाधिकारीसो,जिल्हाधिकारी कार्यालय,सातारा यांना माहीतीस्तव सविनय सादर.
2. मा. आयुक्त,समाज कल्याण,महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहीतीस्तव सविनय सादर.
3. मा. प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण पुणे विभाग पुणे यांना माहीतीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, सातारा.**
**४०९/९ ब, सदर बझार, सातारा - ४१५ ००१.**
फोन नं :- (०२१६२) २३४२४६ E Mail Id :— sdswosatara@gmail.com

जा.क्र. सआसकसा/भासशि/डिबीडी /मुदतवाढ/२०१८-१९/ 112 दिनांक :- १६/०३/२०१९

**प्रति,**
प्राचार्य,
सर्व महाविद्यालये,
सातारा जिल्हा

**विषय :- डिबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ दिलेबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस सुचित करण्यात येते की, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र शासनाने https://mahadbtmahait.gov.in हे संकेतस्थळ सुरु केले आहे. सदर पोर्टलवर अनु. जाती., विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गामधील विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी २८ फेब्रुवारी २०१९, तदनंतर १० मार्च २०१९ अशी अंतिम दिनांक देण्यात आलेली होती.

परंतु, शासनामार्फत खाली नमुद केल्याप्रमाणे पुनश्च प्रवर्गनिहाय मुदतवाढ दिलेली आहे.

| अ. क्र. | विभागाचे नांव | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (For **SC** Student) | **२१ मार्च २०१९** |
| २ | विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण (For **Vjnt, Obc, Sbc** Student) | **२० मार्च २०१९** |

तरी याबाबत आपणांस अंतिमत: कळविण्यात येते कि, **शैक्षणिक वर्ष 2019-20 मधील महाडिबीटी पोर्टलवरील अनु. जाती, विजाभज, विमाप्र व इमाव या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजनेचे प्रलंबित असणा-या पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज पुढील कार्यवाहिस्तव या कार्यालयास 15 जुलै 2020 पुर्वी ऑनलाईन या कार्यालयाचे लॉगिनवर पाठविण्यात यावेत.** जेणेकरुन सदरचे पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजनेचे अर्ज निकाली काढणे सोईचे होईल. सदर प्रलंबित असणारे पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन या कार्यालयाकडे न पाठविल्यास प्रलंबित अर्ज शासन आदेशान्वये रदद अथवा नामंजुर झाल्यास व त्यामुळे सदर विद्यार्थी शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजनेपासुन वंचित राहिल्यास यास महाविद्यालय व महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहिल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**सोबत : प्रलंबित अर्ज असणा-या महाविद्यालयांची यादी.**

(डॉ. सपना घोळवे)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, सातारा.

प्रति माहितीस्तव सविनय सादर
1) मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे.
2) मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
3) मा. जिल्हाधिकारी सो, सातारा.
4) मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
5) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण पुणे विभाग पुणे.
6) मा. कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

# सहायक आयुक्त, समाज कल्याण, सातारा.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सर्व्हे नं २२ अ,
बॉम्बे रेस्टॉरंट - जुनी एम आय डी सी रोड सातारा ४१५ ००३
फोन नं :- (०२१६२) २९८१०६ E Mail Id :— acswosatara@gmail.com

क्र.सआसकसा/भासशि/महाडीबीटी/विद्यार्थी अर्ज/20-21/ 2405 दिनांक : 03/12/2020

प्रति,
प्राचार्य,
कनिष्ठ/ वरिष्ठ/ व्यावसाईक/ तांत्रिक
सर्व महाविद्यालये सातारा जिल्हा

विषय :- शैक्षणिक वर्ष सन 2020-21 मधील Mahadbt प्रणालीवर विदयार्थ्यांचे नवीन/नुतनीकरणाचे अर्ज ऑनलाईन महाविदयालयातच भरण्याची सुविधा उपलब्ध करणेबावत.
संदर्भ :- मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण पुणे विभाग पुणे या कार्यालयाकडील दि.18/11/2020 रोजीचा ईमेल

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2018-19 पासुन भारत सरकार शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजनेसाठी MahadbtMahait.gov.in हि ऑनलाईन प्रणाली सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत विकसीत करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस सुचित करण्यात येते की, आपले महाविद्यालयातील अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि, राजर्षी छत्रपती शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, विदयावेतन या योजनेचे नविन/नुतनीकरणाचे अर्ज Mahadbt या प्रणालीवर भरण्याची सुविधा **दिनांक** 3/12/2020 पासुन सुरु होत आहे. त्यानुसार, आपले महाविद्यालयातील अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि, राजर्षी छत्रपती शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, विदयावेतन या योजनांचे नविन/नुतनीकरणाचे अर्ज विद्यार्थ्यांकडुन भरुन घेणेत यावेत.

सध्यस्थितीत सन 2020-21 या शैक्षणिक वर्षातील नविन/नुतनीकरणाचे अर्ज भरण्याची सुविधा Mahadbt या ऑनलाईन संगणक प्रणालीमध्ये सुरु झाल्याने. ऑनलाईन अर्ज भरताना विदयार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे महाविदयालयांनी सर्व प्रवेशित मागासवर्गीय विदयार्थ्यांचे ऑनलाईन नुतनीकरणाचे अर्ज महाविदयालयातच भरुन घ्यावेत. त्यासाठी महाविदयालयांनी त्यांचे दर्शनी भागावर संबंधीत विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याबाबत नोटीस लावण्यात यावी, तसेच प्रत्येक वर्गात नोटीसही फीरविण्याची व्यवस्था करावी. याबाबत विदयार्थ्यांची कोणत्याही प्रकारे तक्रार होणार नाही किंवा विद्यार्थी उपरोक्त नमुद योजनांच्या लाभापासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासुन वंचित राहिल्यास तसेच विद्यार्थी/ पालक/ संघटना यांचेकडुन तक्रारी झाल्यास विद्यार्थ्यांच्या तसेच महाविद्यालयाच्या होणा-या नुकसानीस महाविदयालय व महाविद्यालय प्रशासन जवाबदार राहील, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(नितीन उबाळे)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण सातारा

प्रत माहितीस्तव सविनय सादर
1) मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
2) मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
3) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण पुणे विभाग पुणे.



Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग
**सहायक आयुक्त ,समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा 415003.
दुरध्वनी क्र.02162-298106 Email- acswosatara@gmail.com.

---

क्र.सआसकसा/भासशि/शिष्यवृत्ती/20-21/320
दिनांक :27.01.2021

प्रति,
प्राचार्य,
------------------
-------------------

विषय-सन 2020-21 या शैक्षणिक वर्षातील महाडीबीटी पोर्टलवरिल अनुसूचित जाती,विमुक्त् जाती व भटक्या जमाती,इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विदयार्थ्यांच्याकरीता शिष्यवृत्ती योजनांच्या अर्जाबाबत.

संदर्भ-1) मा.सहआयुक्त (शिक्षण) समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाकडील पत्र जा.क्र.सकआ/शिक्षण/भासशि/का-4क/2020-21/105 दि.18.01.2021.
2) दिनांक 21.01.2021 रोजीची या कार्यालयाकडील सर्व महाविदयालयांची घेणेत आलेली बैठक.

उपरोक्त नमुद संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविणेत येते की सन 2021 या शैक्षणिक वर्षातील अनुसूचित जाती,विमुक्त् जाती व भटक्या जमाती,इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विदयार्थ्यांचे भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती,राज्य शासनाच्या शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना,परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती योजना,राजर्षी शाहु महाराज मॅट्रिकोत्तर गुणवत्ता शिष्यवृत्ती आणि व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकत असलेल्या मुलां-मुलींना निर्वाह भत्ता (विदयावेतन) इ.योजना माहीती व तंत्रज्ञान विभाग महाराष्ट्र शासन यांनी विकसीत केलेल्या महाडीबीटी पोर्टल या प्रणालीव्दारे राबविण्यात येते याबाबत सदर योजनांचे सन 2020-21 या शैक्षणिक सदर योजनांचे सन 2020-21 या शैक्षणिक वर्षातील अर्ज नोंदणीची संख्या अत्यल्प असुन सदर अर्ज तात्काळ नोंदणीकृत व निकाली काढणेकरीता अधिक गती यावी म्हणुन या कार्यालयालयामार्फत दिनांक 21.01.2021 रोजी सर्व महाविदयालयातील प्राचार्यांची व शिष्यवृत्तीचे कामकाज पाहणारे संबणित क्लार्क यांची बैठक घेणेत आलेली आहे.त्याअनुषंगाने दिनांक 27.01.2021 च्या डॅशबोर्ड नुसार महाविदयालय स्तरावर विदयार्थ्यांची अर्ज प्राप्त संख्या हि फक्त 2736 असुन महाविदयालयांनी approved केलेली विदयार्थ्यांच्या अर्जाची संख्या हि फक्त 136 आहे.महाडीबीटी प्रणालीवरील अर्ज नोदणी व प्रलंबित अर्ज निकाली काढण्याच्या प्रक्रियेला अदयापही गती आल्याचे दिसुन येत नाही.त्यामुळे महाविदयालय स्तरावर पात्र विदयार्थ्यांची अर्जाची संख्या वाढविणेची जबाबदारी हि प्राचार्य यांची आहे.व सन 2020-21 चे अर्ज् जास्त प्रमाणात विदयार्थ्यांच्या कडुन भरून घेणेची सर्वतोपरी जबाबदारी हि आपली राहील.तसेच महाडीबीटी प्रणालीवरील जास्तीत जास्त अर्जाची अंमलबाजावणी होणेसाठी सर्व महाविदयालयातील प्राचार्य यांनी खालील प्रमाणे दिलेल्या सुचनांचे काटकोरपणे पालन करावे.

1) **<u>नुतनीकरणाचे अर्ज प्राधान्याने नोंदणीकृत करून निकाली काढणेबाबत-</u>**
नुतनीकरणाचे अर्ज प्राधान्याने नोंदणीकृत करून निकाली काढणेबाबत-नवीन व नुतनीकरण या दोन्ही प्रकारचे अर्ज अपेक्षित असुन नुतनीकरण अर्जाचे प्रमाण 60 ते 65 टक्केपेक्षा जास्त असतात.प्रचलित पध्दतीनुसार नुतनीकरणाचे अर्ज तात्काळ नोंदणीकृत होऊन महाविदयालय स्तरावरून प्रणालीव्दारे या कार्यालयालयाकडे अग्रेसित होणे आवश्यक आहेत त्यानुसार नुतनीकरणाचे अर्ज तात्काळ नोंदणीकृत करून महाविदयालय स्तरावरून या कार्यालयाकडे मान्यतेस्तव अग्रेसित करणे आवश्यक आहेत जेणेकरून मोठया प्रमाणात अर्जानवरील प्रक्रिया पुर्ण करणे सोईचे होईल.



Scanned by CamScanner

2) **महाविदयालयात 75 % प्रत्यक्ष उपस्थितीबाबत-**

उपरोक्त संदर्भ क्रमांक 2 अन्वये सर्व महाविदयालयांनी चालु वर्षात कोवीड-19 महामारीची परिस्थिती लक्षात घेता प्रत्यक्ष उपस्थितीबाबत विदयार्थी व महाविदयालयांमध्ये संभ्रम निर्माण होत असलेची बाब निदर्शनास आलेली आहे.याबाबत वास्तविक पाहता प्रत्यक्ष उपस्थितीची बाब ही शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्या सत्राकरीता लागु होत असते.पहिल्या सत्रात विदयार्थ्यांची नवीन अथवा नुतनीकरणाचे अर्ज् महाविदयालय प्रणालीमध्ये अर्ज नोंदणीकृत होताच तपासुन तात्काळ या कार्यालयाकडे अग्रेसित करणेत येतात.तरी याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडुन शासनास उपरोक्त निर्माण झालेल्या संभ्रमाचे निराकरण करणेकरीता शासन स्तरावरून योग्य ते मार्गदर्शन प्राप्त होणेकरीता पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.शासनाकडुन मार्गदर्शन प्राप्त होईपर्यंत किमान चालु शैक्षणिक वर्षातील पहिल्या सत्रातले अर्ज तपासुन मान्य करण्यास कोणतीही अडचण येवू नये व अर्ज या कार्यालयाकडे प्रणालीव्दारे त्वरित अग्रेसित करणेत यावे.

3) **विदयार्थ्यांना निकालाची प्रत प्रत्यक्ष प्राप्त होत नसलेबाबत-**

बऱ्याच विदयार्थ्यांना निकालाची प्रत प्रत्यक्ष प्राप्त झाली नसल्याने केवळ ऑनलाईन निकाल संबधित शैक्षणिक विभागाने वितरित केल्यामुहे नुतनीकरणाचे अर्जावर प्रक्रिया करणे शक्य होत नसल्याचे महाविदयालयांनी निदर्शनास आणुन दिले आहे.याबाबत चालु कोवीड परिस्थितीमुळे बऱ्याच अभ्यासक्रमांना शिकत असलेल्या विदयार्थ्यांना त्यांच्या मागील शैक्षणिक वर्ष म्हणजे 2019-20 करीताचक शैक्षणिक निकालाची प्रत अप्राप्त असुन त्यांना केवळ ऑनलाईन निकाल दर्शविणेत येत आहे.सदर बाब लक्षात घेता याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडुन शासनास स्वयंस्पष्ट सुचना निर्गमित करणेबाबत कळविले आहे.मात्र याबाबत शासनाकडुन पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत अशा प्रकारच्या नविन व नुतनीकरणाचे अर्ज प्रणालीव्दारे अग्रेसित करण्याकरता ऑनलाईन निकालाच्या प्रतीवर महाविदयालयाच्या प्राचार्यांची साक्षांकित करून सदर प्रत प्रणालीमध्ये जोडण्यास हरकत नसुन अशा पध्दतीने महाविदयालयस्तरावरील प्रलंबित असलेले अर्ज फॉरवर्ड करण्याच्या प्रक्रियेची कार्यवाही करणेत यावी.

4) **चालु शैक्षणिक वर्षाकरीताची शुल्क रचना प्रणालीमध्ये निश्चीत न झाल्याने –**

जिल्हयातील बहुतांश अभ्यासक्रमांची चालु शैक्षणिक वर्षा करीताची शिक्षण शुल्क,परिक्षा शुल्क व इतर शुल्क इ.संबधित सक्षम प्राधिकारणांकडुन अदयापही निश्चित करण्यात आली नसल्याने महाडीबीटी प्रणालीमध्ये सदर शुल्क रचना पूर्ण दर्शविण्यात येत नाही व त्यामुळे महाविदयालयातील बहुतांश अर्ज पुढील प्रक्रियेकरीता प्रलंबित आहेत.याबाबत वरिष्ठ कार्यालयास्तरावरून संबधित शैक्षणिक वर्षाकरीताची शिक्षण शुल्क,परिक्षा शुल्क व इतर शुल्क इ.सक्षम प्राधिकारणांना या अगोदरच वेळोवेळी अवगत करणेत आले असुन त्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.महाडीबीटी पोर्टलवर दर्शविण्यात आलेल्या अभ्यासक्रमांच्या तसेच अभ्यासक्रमांच्या शुल्क रचनेत (Fee structure) संबधित अधिकृत विभागाने म्हणजे शुल्क नियामक समिती (FRA),संबधित विदयापीठे,संचलनालय उच्च व तंत्र शिक्षण विभाग,संचलनालय औषदी द्राव्य वैदयकिय शिक्षण विभाग संचलनालय शालेय शिक्षण विभाग ,संचलनालय व्यावसायिक शिक्षण विभाग,कृषी परिषदा,/विदयापीठे इ.मार्फत शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क,विकास शुल्क व इतर शुल्क पोर्टल मध्ये निर्धारित करून त्यास ऑनलाईन मान्यता देण्यात आलेली आहे.तसेच पोर्टलवरिल नोंदणीकृत असलेल्या महाविदयालयांच्या विवीध मान्यता (उदा.AICTE,UGC,NAAC,NBA इ.) अभ्यासक्रमांची मान्यता,अभ्यासक्रमास लागु असलेली शुल्क रचना,इ सर्व बाबी देखील उपरोक्त अधिकृत विभागाने /सक्षम प्राधिकरणाने निर्धारित करून त्यास प्रणालीमध्ये ऑनलाईन मान्यता दिलेली आहे.त्यामुळे यासंदर्भातील कोणतेही संभ्रम आढळल्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व त्यांच्या अधिनिस्त असलेले आयुक्तालय,व प्रादेशिक कार्यालय पुणे व सहायक आयुक्त समाज कल्याण सातारा या कार्यालयांची जबाबदारी नसुन संबधित अधिकृत विभागांशी संपर्क साधावा.प्रलंबित अर्ज निकाली काढणेबाबत कोणत्याही स्वरूपाचा हलगर्जीपणा,टाळाटाळ अथवा दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आल्यास संबधित महाविदयालयाचे प्राचार्य व शिष्यवृत्तीचे काम करणारे संबधित क्लार्क यांचे वर शिस्त भंगाची प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल याची नोंद गांभिर्याने घेणेत यावी.

**(नितीन उबाळे)**
**सहाय्यक आयुक्त ,**
**समाज कल्याण सातारा.**

**प्रत माहीतीस्तव सविनय सादर,**

1. **मा.आयुक्त,समाज कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य पुणे यांचे माहीतीसाठी सविनय सादर.**
2. **मा.सहआयुक्त (शिक्षण),समाज कल्याण विभाग पुणे यांचे माहीतीसाठी सविनय सादर.**
3. **मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण पुणे विभाग पुणे. यांचे माहीतीसाठी सविनय सादर.**



Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा ४१५००३
दूरध्वनी क्र. (०२१६२) २९८१०६ E mail- acswosatara@gmail.com

क्र.सआसकसा/भासशि/अर्जनोंदणी/२०-२१/ 713 दिनांक : १९/०२/२०२१ 20

प्रति,
प्राचार्य
कनिष्ठ, वरिष्ठ/ अनुदानित/विनाअनुदानित,
तांत्रिक/औषधनिर्माण/नर्सिंग/वैद्यक/कृषी इ. महाविद्यालये जिल्हा,सातारा

विषय : Mahadbt प्रणालीवर अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गाच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरण्याबाबत

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग (मातं) शासन निर्णय क्र. सातवि-मातंस-२०१८/प्र.क्र.१३८/से-१/३९ मंत्रालय मुंबई दिनांक १२/१०/२०१८
२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक इबीसी-२०१८/प्र.क्र.४८४/ शिक्षण-१ मंत्रालय मुंबई दिनांक ०८/०१/२०१९
३) विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक इबीसी-२०१७/प्र.क्र.४५/ शिक्षण मंत्रालय मुंबई दिनांक १९/०१/२०१९
४) यशवंतराव चव्हाण इन्स्टीट्युट ऑफ सायन्स सातारा या महाविद्यालयामध्ये दिनांक २१/०१/२०२१ रोजी सातारा जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांची आयोजित बैठक

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन भारत सरकार शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजना राबविण्यासाठी शासनाने संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये Mahadbt हे संकेतस्थळ विकसीत केलेले आहे. सदर संकेतस्थळावर विद्यार्थी ऑनलाईन अर्ज करुन पडताळणी करिता संबंधित महाविद्यालयाकडे सदरचा अर्ज सादर करतात. सदरचा अर्ज महाविद्यालयाकडुन आवश्यक कागदपत्रांची व अभ्यासक्रमनिहाय तसेच वर्गनिहाय फि ची पडताळणी करुन ते अर्ज महाविद्यालयांकडुन मंजुर करुन पुढील कार्यवाहीस्तव संबंधीत विभागांना पाठविले जातात.

त्याअन्वये संदर्भ क्र.मां ४ च्या बैठकीमध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र या प्रवर्गातील भारत सरकार शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजनेचे अर्ज विद्यार्थ्यांकडुन भरुन घेवुन ते विनाविलंब मंजुरीसाठी पाठविण्याबाबत सुचित करण्यात आलेले होते. परंतु, या बाबत आपल्या महाविद्यालयाकडुन/ महाविद्यालय प्रशासनाकडुन अपेक्षित कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही हि बाब मागासवर्गीय विद्यार्थ्यांप्रती हितप्रिय नाही. त्यानुसार आपणांस पुनश्च कळविण्यात येते की, सदर योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांना अर्ज भरणेबाबत आपल्या महाविद्यालयाने/ महाविद्यालय प्रशासनाने प्रेरित करावे तसेच या योजनेअंतर्गत मिळणारे लाभ विषयक माहिती संबंधित विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी. आपल्या महाविद्यालयातील उपरोक्त नमुद प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याबाबत महाविद्यालयातच सुविधा उपलब्ध करुन द्यावी तसेच महाविद्यालय स्तरावरती सदर अर्ज भरतेवेळी विद्यार्थ्यांना येणा-या अडीअडचणी सोडविण्यासंदर्भात कमिटी स्थापन करण्यात यावी व विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात यावे. सदर कमिटीव्दारे विद्यार्थ्यांच्या अडीअडचणीं सोडविण्यास काहि प्रश्न उदभवल्यास त्याबाबत या कार्यालयास अवगत करावे.

त्याचप्रमाणे आपले महाविद्यालयातील वर्गनिहाय उपरोक्त नमुद प्रवर्गातील प्रवेशित विद्यार्थी संख्या व भारत सरकार शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजनेचे अर्ज भरलेली विद्यार्थी संख्या याबाबतचा आपले महाविद्यालय प्रशासनाकडुन साप्ताहिक आढावा घेण्यात यावा. या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयाने/ महाविद्यालय प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत आढावा या कार्यालयाकडुन घेण्यात येईल.

उपरोक्त नमुद प्रमाणे महाविद्यालयाकडुन विहित कालावधीत पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन न घेतल्याने अशा विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत भविष्यात काही प्रश्न निर्माण झाल्यास त्यास महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहील याची गाभीर्याने नोंद घ्यावी.

(नितीन उबाळे)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, सातारा.

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१) मा. जिल्हाधिकारी सो, सातारा
२) मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे.
३) मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) मा. कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर.
५) मा. संचालक, उच्च शिक्षण, कोल्हापुर विभाग कोल्हापुर.
६) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण पुणे विभाग पुणे.
७) मा. शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग
सहायक आयुक्त , समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा 415003.
दुरध्वनी क्र 02162-298106 ई-मेल- acswosatara@gmail.com

जा.क्र.सआसकसा/ महाडिबीटी /प्रलंबित/अर्ज/२०२०.२१/ 1176 दिनांक :- १८ / ०३ / २०२१
19

प्रति,
प्राचार्य,
............................
............................

**विषय** — महाडिबीटी प्रणालीवरील सन २०१९.२० व २०२०.२१ या वर्षातील प्रलंबित अर्जावर करावाच्या कार्यवाहीबाबत...

**संदर्भ** - १. मा. सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, म.रा.पुणे यांचे दुरध्वनी सुचना दि. १८/०३/२०२१
२. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण पुणे विभाग,पुणे यांचे कडील पत्र दि. १७/०३/२०२१

वरील विषयास अनुसरुन संदर्भीय पत्रान्वये महाडिबीटी पोर्टल बाबत मा. सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, म.रा. पुणे यांनी सूचना दिलेल्या असून त्या खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

सन २०२०.२१ हे आर्थिक वर्ष समाप्त होत आले आहे तरी महाआयटी यांच्या तांत्रिक कक्षाने आयुक्तालयास कळविल्या प्रमाणे सर्व महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ मधील प्रलंबित अर्ज विद्यार्थीस्तर, महाविद्यालय व सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय स्तरावरील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे महाडीबीटी प्रणालीवरील अर्ज तात्काळ तपासून व मंजूर करुन ऑनलाइन दिनांक २३/०३/२०२१ पर्यंत अग्रेषित करावेत जेणेकरुन त्यांचे २०२०.२१ या आर्थिक वर्षात देयक तयार होऊन वेळेत शिष्यवृत्ती रक्कम विद्यार्थी व महाविद्यालयाच्या आधार सलंग्न बँक खात्यात जमा होईल.

याबाबत आपल्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या प्राचार्याची राहील अशा स्पष्ट सूचना निर्गमित करणेत आलेल्या आहेत. त्यानुसार महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित विद्यार्थ्यांचा अर्ज तात्काळ तपासून सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे लॉगीनला दि. २३/०३/२०२१ अखेर पाठविण्यात यावेत.

वरील सुचनाचे पालन न केल्यास व अनुसूचित जाती प्रवार्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील यांची नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे प्रलंबित अर्जावर तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहायक आयुक्त,
समाज कल्याण सातारा

प्रत माहितीस्तव-
१. मा. आयुक्त समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. सहा.आयुक्त (शिक्षण), समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे
३. मा. प्रादे.उपा.समाज कल्याण विभाग पुणे, पुणे

Local Disk (D:)/कार्यासन VJNT(5)-SC(7) /2020.21/SC/ Letter

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा ४१५००३
दूरध्वनी क्र. (०२१६२) २९८१०६ E mail- acswosatara@gmail.com

क्र.सआसकसा/भासशि/DBTफिमंजुरी/२०-२१/ १६७ दिनांक : ०८/०२/२०२१

प्रति,
प्राचार्य,
कनिष्ठ, वरिष्ठ/ अनुदानित/विनाअनुदानित,
तांत्रिक/औषधनिर्माण/नर्सिंग/वैद्यक/कृषी इ. महाविद्यालये
जिल्हा, सातारा

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे मंजुर होणा-या शुल्काबाबत

संदर्भ : १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक इबीसी- २०१७/प्र.क्र.४०३/ शिक्षण-१ मंत्रालय मुंबई दिनांक ०७/०८/२०१७
२) सामान्य प्रशासन विभाग (मातं) शासन निर्णय क्र. सातवि-मातंस-२०१८/प्र.क्र.१३८/से-१/३९ मंत्रालय मुंबई दिनांक १२/१०/२०१८
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक इबीसी-२०१८/प्र.क्र.४८४/ शिक्षण-१ मंत्रालय मुंबई दिनांक ०८/०१/२०१९
४) विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक इबीसी-२०१७/प्र.क्र.४५/ शिक्षण मंत्रालय मुंबई दिनांक १९/०१/२०१९

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन भारत सरकार शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजना राबविण्यासाठी शासनाने संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये Mahadbt हे संकेतस्थळ विकसीत केलेले आहे. सदर संकेतस्थळावर विद्यार्थी ऑनलाईन अर्ज करुन पडताळणी करिता संबंधित महाविद्यालयाकडे सदरचा अर्ज सादर करतात. सदर अर्ज महाविद्यालयाकडुन आवश्यक कागदपत्रांची व अभ्यासक्रमनिहाय तसेच वर्गनिहाय फि ची पडताळणी करुन पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांकडुन मंजुर करुन पुढील कार्यवाहीस्तव या कार्यालयाकडे ऑनलाईन सादर केले जातात.

उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ व ४ चे शासन निर्णयान्वये महाविद्यालयातील अभ्यासक्रमांसाठीचे विहीत शैक्षणिक शुल्क व विकास निधी इ. शुल्क तत्सम प्राधिका-याकडुन निश्चित केले जाते. त्यानुसार Mahadbt प्रणालिवर सदरील शैक्षणिक शुल्क, विकास निधी, परिक्षा शुल्क व इतर शुल्क इ. ची रक्कम संबंधित सक्षम प्राधिका-यांनी नोंदवलेली जाते. सबब Mahadbt प्रणालीवर महाविद्यालयांच्या लॉगिन आयडी वर दर्शविण्यात आलेल्या शुल्क रचनेची खातरजमा करण्याची जबाबदारी हि शुल्क नियामक प्राधिकरणाची/ संबंधित यंत्रणेची आहे त्याचबरोबर संबंधित सक्षम प्राधिकरणांमार्फत/ यंत्रणेमार्फत मंजुर केलेल्या शुल्करचनेची पुर्नपडताळणी करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्यांची राहिल असे स्पष्ट नमुद केलेले आहे. त्याअन्वये उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार संबंधीत प्राधिकरणामार्फत/ यंत्रणेमार्फत दर्शविण्यात/मंजुर करण्यात आलेल्या शुल्क रचनेची वर्षनिहाय व वर्गनिहाय खातरजमा करुनच अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मंजुर करुन ऑनलाईन या कार्यालयास सादर करण्यात यावेत.



Scanned by CamScanner

आपले महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासनाकडुन योग्य ते शुल्क अद्ययावत करुन ते संबंधीत यंत्रणेकडुन मंजुर करुन घ्यावयाचे आहे. तसेच सदर शुल्क मंजुर करतेवळी कमी अथवा जादाचे मंजुर करुन अर्ज या कार्यालयास सादर करण्यात येवु नयेत. आपले महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासनाकडुन कमी अथवा जादाचे म्हणजेच चुकीचे शुल्क मंजुर घेवुन विद्यार्थ्यांकडुन कोणत्याही शुल्काची रक्कम घेऊ नये, तसेच कोणत्याही विद्यार्थ्याची आर्थिक पिळवणूक करु नये याबाबतची जबाबदारी/ दक्षता महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासन व संबंधित शैक्षणिक संस्थेने घेणे आवश्यक आहे. फि कमी अथवा जादा मंजुर झाल्यास याबाबत विद्यार्थी, पालक, विविध संघटना यांचेकडुन या कार्यालयास विचारणा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे याबाबत आपले महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासन यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

उपरोक्त नमुद केलेनुसार सदर बाबत महाविद्यालय व महाविद्यालय प्रशासनाने सदर सुचनांचे उल्लंघन झाल्याचे अढळुण आल्यास महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासन यांचेविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(नितीन उबाळे)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, सातारा.

प्रति माहितीस्तव सविनय सादर

१) मा. जिल्हाधिकारीसो, सातारा.
२) मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग पुणे.
६) मा. चेअरमन, शुल्क नियामक प्राधिकारण, महाराष्ट्र राज्य मुंबई.
७) मा. कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर.
८) मा. कुलगुरु, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी जि. अहमदनगर
९) मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे ता. जि. रायगड
१०) मा. कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
११) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण पुणे विभाग पुणे.
१२) मा. सह संचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, ४१२ ई शिवाजीनगर पुणे.
१३) मा. शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा





Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग
सहायक आयुक्त , समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा 415003.
दुरध्वनी क्र 02162-298106 ई-मेल- acswosatara@gmail.com

जा.क्र.सआसकसा/ भासशि/DBT/२०२१.२२/ 1420 दिनांक :- ०१ / ०४ / २०२१

प्रति,
प्राचार्य,
..............................................
..............................................जि. सातारा

**विषय** - महाडिबीटी प्रणालीवर विद्यार्थी अर्ज स्विकृतीत मुदतवाढ दिले बाबत...
**संदर्भ** - महाडिबीटी पोर्टलवरील प्रसिध्द सुचना.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविणेत येते की, दिनांक ०३/१२/२०२० पासून महाडिबीटी प्रणालीवर नवीन अर्ज नोंदणीस प्रारंभ झाला होता. सदर बाबत या कार्यालयाने या अगोदरच अवगत केलेले आहे. सदर सन २०१९.२० व २०२०.२१ मधील अर्ज या कार्यालयास सादर करण्यासाठी ३१.०३.२०२१ पर्यंत कालावधी विहीत करण्यात आलेला होता तथापि या विहीत कालावधीत कार्यवाही न करण्यात आल्यामुळे अद्याप महाविद्यालयाचे स्तरावर अर्ज मोठयासंख्येने प्रलंबित असल्याचे दिसून येत आहेत. याबाबत मा. आयुक्त, समाज कल्याण व मा. संचालक, इतर मागासवर्गीय व बहुजन कल्याण यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

महाविद्यालय स्तरावर अद्यापही मोठयासंख्येने मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित असल्याने शासन स्तरावरुन महाडिबीटी प्रणालीवर **अर्ज स्विकृतीचा कालावधी दिनांक १५/०४/२०२१ पर्यंत वाढविण्यात आलेला आहे**. तरी आपण आपले महाविद्यालयातील अनुसूचित जाती, विजाभज, इमाव, व विमाप्र प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांच्या अर्जांबाबत स्विकृतीची कार्यवाही तात्काळ करावी व आपल्या संस्थेतील पात्र असणारा एकही मागासवर्गीय विद्यार्थी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही यांची नोंद घ्यावी. अशा विद्यार्थ्यांची परीपूर्ण स्वरुपातील अर्ज छाननी केलेले अर्ज महाविद्यालयांनी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयास ऑनलाईनरीत्या सादर करावयाचे आहेत. महाडिबीटी ऑनलाईन प्रणालीमधून महाविद्यालयास देय असणारे शिक्षण शुल्क त्यांचे खातेवर अलहिदा जमा केले जाणार आहेत. त्यामुळे शैक्षणिक संस्था यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी आकारणी करु नये व मागासवर्गीय विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी. या उपरोक्त जर महाविद्यालयांकडून विहीत कालावधीत अर्जांबाबत कार्यवाही न झाल्याने विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित राहीले तर अशा विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत महाविद्यालयातील काम करणारे संबंधित क्लार्क व प्राचार्य जबाबदार राहील यांची नोंद घ्यावी.

सहायक आयुक्त,
समाज कल्याण सातारा

प्रत माहितीस्तव-
१. मा. आयुक्त समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. संचालक, इतर मागासवर्गीय व बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे
३. मा. सहा.आयुक्त (शिक्षण), समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे
४. मा. उप संचालक, माध्यमिक शिक्षण, कोल्हापूर विभाग
५. मा. प्रादे. उपा.समाज कल्याण विभाग पुणे, पुणे

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग
सहायक आयुक्त , समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा 415003.
दुरध्वनी क्र 02162-298106 ई-मेल- acswosatara@gmail.com

जा.क्र.सआसकसा/ प्रेस नोट/ प्रसिध्दी/२०२१.२२/ 1642 दिनांक :- ३० एप्रिल २०२१

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी ,
सातारा

**विषय** - मागासवर्गीय शिष्यवृत्ती नोंदणीसाठी प्रेसनोट प्रसिध्दीबाबत...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परिक्षा फी व इतर योजनेचा लाभ मिळणेकरीता शैक्षणिक वर्ष २०२०.२१ साठी महाडिबीटी प्रणालीवरील अर्ज भरणेसाठी मुदत वाढविणेत आली आहे.

याबाबत सोबतची प्रेसनोटची प्रसिध्दी जास्तीत जास्त प्रमाणात आपले स्तरावरुन जास्त खपाचे असणारे स्थानिक वृत्त पत्रामध्ये प्रसिध्दी करणेत यावी.

**सोबत** - प्रेस नोट जोडणेत आली आहे.

30/4/21

( नितीन उबाळे )
सहायक आयुक्त,
समाज कल्याण सातारा
८३२९५५३८६५

प्रत माहितीस्तव -
१. मा. आयुक्त, समाजकल्याण आयक्तालय म.रा. पुणे .
२. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण पुणे विभाग, पुणे.

# प्रेसनोट

## शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी महाडिबीटी प्रणालीवरील अर्ज भरणेसाठी मुदत वाढविणेत आले बाबत

सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यासाठी सन २०१८-१९ पासून महाडिबीटी या ऑनलाईन प्रणालीवर शिष्यवत्ती शिक्षण फी परिक्षा फी व इतर योजनांचे अर्ज भरणेत येतात. सर्व महाविद्यालयांना कळविणेत येते की सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात आपले महाविद्यालयातील विद्यार्थ्याचा अर्ज भरणेसाठी **दि. ३१/०५/२०२१ पर्यंत मुदतवाढ** देणेत आलेली आहे. सन २०२०.२१ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यार्थ्यांना अर्ज भरणेसाठी ही शेवटची संधी देणेत आलेली आहे. यापुढे मुदत वाढ देण्यात येणार नसून पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी विहित मुदतीमध्ये अर्ज भरणेसाठी व ज्या विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये महाविद्यालय स्तरावरुन **Sent back to applicant** मध्ये अर्ज त्रुटी पुर्ततेसाठी पाठविणेत आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांचे अर्ज तात्काळ तपासणे यावेत तसेच त्रुटी पुर्तता पुर्ण केलेले अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण यांचे लॉगीनमध्ये पाठविणेत यावेत.

महाविद्यालयाच्या **Sent back to applicant मध्ये अनु. जाती प्रवर्गाचे ६१७ अर्ज व विजाभज, विमाप्र, इमाव प्रवर्गाचे १४५५ अर्ज असून जास्त प्रमाणात आहेत.** ही अत्यंत गंभीर बाब आहे. याबात सातारा जिल्हयातील सर्व प्राचार्य, कॉलेज महाविद्यालयांना विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज भरुन घेणे व प्रलंबित अर्ज महाविद्यालय स्तरावरुन दररोज निकाली काढणेबाबत सूचित केलेले आहे. याबाबत मा. जिल्हाधिकारी सातारा व मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांना कळविणेत आलेले आहे.

तरी सर्व महाविद्यालयांना पुश्चः सुचित करणेत येते की, कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्ती, शिक्षण फी परिक्षा फी, विद्यावेतन, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना पासून वंचित राहणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयातील प्राचार्य यांची राहील. तसेच जास्तीत जास्त मागासवर्गीय पात्र विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त प्रमाणात शिष्यवृत्ती व इतर योजनांचे अर्ज भरणेत यावेत. असे आवाहन सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा श्री. नितीन उबाळे यांनी केले आहे.

30/4/21

( नितीन उबाळे )
सहायक आयुक्त,
समाज कल्याण सातारा

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा ४१५००३
दूरध्वनी क्र. (०२१६२) २९८१०६ E mail- acswosatara@gmail.com

क्र.सआसकसा/भासशि/DBT/2nd Install /२०-२१/७८२८ दिनांक : १२/०५/२०२१

प्रति,
प्राचार्य,
कनिष्ठ, वरिष्ठ/ अनुदानित/विनाअनुदानित,
तांत्रिक/औषधनिर्माण/नर्सिंग/वैद्यक/कृषी इ. महाविद्यालये
जिल्हा,सातारा

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ मधील शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि साठी महाविद्यालयांनी करावयाच्या २nd Installment च्या कार्यवाहीबाबत
संदर्भ : दिनांक १२.०५.२०२१ चा Mahadbt पोर्टलवरील प्रलंबित अर्जांबाबतचा डॅशबोर्ड

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन भारत सरकार शिष्यवृत्ती / शिक्षण फि परिक्षा फि या योजनेसाठी शासनाने Mahadbt हे संकेतस्थळ सुरु केलेले आहे सदर पोर्टलव्दारे विद्यार्थी/ महाविद्यालयांना शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि ची रक्कम दोन हप्त्यांमध्ये वितरीत केली जाते.

उपरोक्त संदर्भिय शैक्षणिक **वर्ष २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ च्या डॅशबोर्ड रिपोर्ट** चे अवलोकन केले असता आपले महाविद्यालयातील अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र या प्रवर्गातील शिष्यवृत्ती / शिक्षण फि परिक्षा फि योजनेचे पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मंजुर झालेले असुन १st Installment ची रक्कम विद्यार्थी/ महाविद्यालये यांना वितरीत झालेली आहे. परंतु, आपले महाविद्यालयाकडुन पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज २nd Installment साठी Apply न केल्याचे दिसुन येत आहेत. सदर कारणामुळे २nd Instllment ची रक्कम विद्यार्थी/ महाविद्यालये यांच्या खात्यावर जमा झालेली नाही. याबाबत आपले महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासन यांनी वेळेत कार्यवाही न केल्यास सदरचा २nd Installment चा टॅब बंद झाल्यास विद्यार्थी/ महाविद्यालय सदर योजनेपासुन वंचित राहुण याबाबत विद्यार्थी /पालक/ संघटना यांचेकडुन विचारणा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे आपणांस याव्दारे सुचित करण्यात येते की, उपरोक्त नमुद प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती, शिक्षण फि परिक्षा फि, राजर्षी छ. शाहु महाराज शिष्यवृत्ती तसेच वसतिगृह निर्वाह भत्ता या योजनेच्या **शैक्षणिक वर्ष २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ मधील २nd Installment साठी Apply करण्याची प्रक्रिया दिनांक २० मे २०२१ पुर्वी पुर्ण करावी.** सदर योजनेपासुन

विद्यार्थी वंचित रहाणार नाही याची महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासन यांनी दक्षता घेण्यात याव. २nd Installment साठी प्रवर्गनिहाय व वर्षनिहाय अर्जांची आकडेवारी सोबत जोडण्यात येत आहे.

(नितीन उबाळे)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, सातारा.

प्रति माहितीस्तव सविनय सादर

१) मा. जिल्हाधिकारीसो, सातारा.
२) मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण पुणे विभाग पुणे.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा ४१५००३
दूरध्वनी क्र. (०२१६२) २९८१०६ E mail- acswosatara@gmail.com

क्र.सआसकसा/भासशि/DBT/२०-२१/अर्ज स्क्रुटीनी/२०-२१/७०२५ दिनांक : १२/०५/२०२१

प्रति,
प्राचार्य,
कनिष्ठ, वरिष्ठ/ अनुदानित/विनाअनुदानित,
तांत्रिक/औषधनिर्माण/नर्सिंग/वैद्यक/कृषी इ. महाविद्यालये
जिल्हा,सातारा

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि साठी या योजनेचे आपले महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज पडताळणी करुन या कार्यालयास ऑनलाईन सादर करणेबाबत

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग (मातं) शासन निर्णय क्र. सातवि-मातंस-२०१८/प्र.क्र.१३८/से-१/३९ मंत्रालय मुंबई दिनांक १२/१०/२०१८
२) विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक इबीसी-२०१७/प्र.क्र.४५/ शिक्षण मंत्रालय मुंबई दिनांक १९/०१/२०१९
३) यशवंतराव चव्हाण इन्स्टीट्युट ऑफ सायन्स सातारा या महाविद्यालयामध्ये दिनांक २१/०१/२०२१ रोजी सातारा जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांची आयोजित बैठक

उपरोक्त संदर्भिय विषयान्वेय आपणांस पुनश्चः व अंतिमतः कळविण्यात येते की, महाडिबीटी पोर्टलवर आपल्या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे अनु. जाती, विजाभज, विमाप्र व इमाव या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजनेचे अर्ज भरलेले दिसुन येत आहेत. सदर अर्जांची पडताळणी करुन पात्र विद्यार्थ्याचे अर्ज पुढील कार्यवाहीस्तव या कार्यालयाकडे ऑनलाईन पाठविणे आवश्यक होते.

तथापि आपल्या महाविद्यालयातील महाडिबीटी या पोर्टलवर अनु. जाती, विजाभज, विमाप्र व इमाव या प्रवर्गातील शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजनेतील महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज पुढील कार्यवाहीस्तव या कार्यालयाकडे ऑनलाईन पाठविणेबाबत या कार्यालयाकडुन आपणांस वेळोवेळी सुचित केलेले आहे. सदर बाबत दैनिक वृत्तपत्रामध्येही बातमी देऊन प्रलंबित पात्र अर्ज निकाली काढण्याबाबत आवाहन ही केले होते. परंतु, अद्यापही आपले महाविद्यालयाचे स्तरावर मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजनेतील अर्ज प्रलंबित असल्याचे दिसुन येत आहेत. यावरुन मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/ शिक्षण

फि परिक्षा फि मंजुरीबाबत आपले महाविद्यालय व महाविद्यालय प्रशासन उदासिन असल्याचे दिसुन येत आहे.

तरी याबाबत आपणांस अंतिमत: कळविण्यात येते कि, **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील महाडिबीटी पोर्टलवरील अनु. जाती, विजाभज, विमाप्र व इमाव या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजनेचे प्रलंबित असणा-या पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज पुढील कार्यवाहिस्तव या कार्यालयास १५ मे २०२१ पुर्वी ऑनलाईन या कार्यालयाचे लॉगिनवर पाठविण्यात यावेत**. जेणेकरुन सदरचे पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजनेचे अर्ज निकाली काढणे सोईचे होईल. पात्र असणा-या विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन या कार्यालयाकडे न पाठविल्यास प्रलंबित अर्ज शासन आदेशान्वये रद्द अथवा नामंजुर होण्याची शक्यता नाकारता येत नाही व तसे झाल्यास सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे कार्यासन जबाबदार राहणार नाही व त्यामुळे सदर विद्यार्थी शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजनेपासुन वंचित राहिल्यास यास महाविद्यालय व महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहिल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**सोबत : प्रलंबित अर्ज असणा-या महाविद्यालयांची यादी.**

(नितीन उबाळे)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, सातारा.

प्रति माहितीस्तव सविनय सादर

१) मा. जिल्हाधिकारीसो, सातारा.
२) मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण पुणे विभाग पुणे.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग
सहायक आयुक्त , समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा 415003.
दुरध्वनी क्र 02162-298106 ई-मेल- acswosatara@gmail.com

जा.क्र.सआसकसा/ Sent back/प्र.अर्ज पाठविणेबाबत/२०२१.२२/ 2813 दिनांक :- ०८ / ०९ / २०२१

प्रति,
प्राचार्य, (सर्व)
..................................................
............................ जि. सातारा

**विषय - महाडिबीटी पोर्टल वरील सन २०२०-२१ व सन २०१९-२० या वर्षातील अनुसूचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र या प्रवर्गातील प्रलंबित असलेल्या अर्जाबाबत...**

**संदर्भ** — मा. आयुक्त, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा दि. ०७/०९/२०२१ रोजीचा या कार्यालयास प्राप्त ई-मेल.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविणेत येते, सन २०२०.२१ या शैक्षणिक वर्षातील अनुसुचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज भरणेसाठी (New/Renewal) महाडिबीटी या ऑनलाईन प्रणालीवर दि. ३०/०९/२०२१ पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे व सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यासाठी अर्ज (Re-Apply) साठी दि. १५/०९/२०२१ पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये महाविद्यालय स्तरावर Sent back to applicant मध्ये त्रुटी पुर्ततेसाठी पाठविण्यात आलेले अर्ज तपासून त्रुटी पुर्तता पुर्ण केलेले अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण यांचे लॉगीनमध्ये पाठविणे आवश्यक आहे.

तथापि, अद्याप पर्यंत **महाविद्यालयाच्या Sent back to applicant मध्ये अनु.जाती प्रवर्गाचे ५०८ अर्ज व विजाभज,विमाप्र व इमाव प्रवर्गाचे १११९ अर्ज व Pending At Institute स्तरावर अनु.जाती प्रवर्गाचे ४५० व विजाभज,विमाप्र व इमाव प्रवर्गाचे ४७६ अर्ज जास्त प्रमाणात प्रलंबित आहेत.** ही अत्यंत गंभीर बाब आहे. याबाबत सातारा जिल्हयातील सर्व प्राचार्य, कॉलेज अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयांना विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज भरुन घेणे व प्रलंबित अर्ज महाविद्यालय स्तरावरुन दररोज निकाली काढणेबाबत सूचित केलेले आहे याबाबत मा. जिल्हाधिकारी सातारा, मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांना कळविण्यात आलेले आहे.

तरी सर्व महाविद्यालयांना पुनश्च: सुचित करणेत येते की, महाविद्यालयाच्या Sent back to applicant मधील अर्ज व महाविद्यालय (Institute) स्तरावरील अर्ज तात्काळ तपासून दररोज निकाली काढणेत आलेले अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे लॉगीनमध्ये विहित मुदतीत पाठविणेत यावेत. मागासवर्गीय पात्र विद्यार्थी शिष्यवृत्ती, शिक्षण फी परिक्षा फी, विद्यावेतन, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनापासून वंचित राहणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयातील प्राचार्य यांची राहील. तसेच जे पात्र विद्यार्थी सदर योजनांपासून वंचित राहतील त्यास सहायक आयुक्त समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय जबाबदार राहणार नाहीत.

कार्यालय अधिक्षक,
सहायक आयुक्त,
समाज कल्याण कार्यालय सातारा

**मा. सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे मान्यतेने.**

प्रत माहितीस्तव-
१. मा. आयुक्त समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. सहा.आयुक्त (शिक्षण), समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे
३. मा. प्रादे. उपा.समाज कल्याण विभाग पुणे, पुणे

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग
सहायक आयुक्त , समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा 415003.
दुरध्वनी क्र 02162-298106 ई-मेल- acswosatara@gmail.com

जा.क्र.सआसकसा/ भासशि/अर्ज मुदतवाढ/प्रेस नोट/ प्रसिध्दी/२०२१.२२/ 2810 दिनांक :- ०६ सप्टेंबर २०२१

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी ,
सातारा

**विषय** - सन २०१९-२० व २०२०-२१ मधील प्रलंबित मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती अर्जांची करीता केलेबाबतची प्रेसनोट ची बातमी प्रसिध्द करणेबाबत...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परिक्षा फी व इतर योजनेचा लाभ मिळणेकरीता **शिष्यवृत्ती शैक्षणिक वर्ष २०२०.२१ साठी महाडिबीटी प्रणालीवरील अर्ज करणेसाठी व अर्ज नुतणीकरणासाठी (New/Renewal) दि. ३०/०९/२०२१ व सन २०१९-२० वर्षातील प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यासाठी पुन्हा अर्ज करण्याची (Re-Apply) करण्याची दिनांक १५ सप्टेंबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.**

याबाबत सोबतची प्रेसनोटची बातमी जास्तीत जास्त प्रमाणात आपले स्तरावरुन जास्त खपाचे असणारे स्थानिक वृत्त पत्रामध्ये प्रसिध्दी करणेत यावी.

**सोबत** - प्रेस नोट जोडणेत आली आहे.

कार्यालय अधिक्षक (प्रभारी)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय

प्रत माहितीस्तव -
१. मा. आयुक्त, समाजकल्याण आयक्तालय म.रा. पुणे .
२. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण पुणे विभाग, पुणे.

# प्रेसनोट

## सन २०१९-२० व २०२०-२१ या वर्षातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती चे प्रलंबित असलेले अर्ज करीता (New/Renewal व Re-Apply) मुदतवाढ देणेत आलेबाबत

सामाजिक न्याय विभागांतर्गत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार शिष्यवृत्ती व शिक्षण फी, परीक्षा फी या योजनांचा लाभ **https://mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावरुन सन २०१८-१९ पासून महाडिबीटी या ऑनलाईन प्रणालीवरुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

कोविड १९ विषाणू या संसर्गामुळे काही महाविद्यालये बंद आहेत. ऑनलाईन पध्दतीने अभ्यासक्रम शिकवला जात असल्याने विद्यार्थी महाविद्यालयात उपस्थित राहत नाहीत. त्यामुळे मागासवर्गीय प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज भरणेकरीता व प्रलंबित अर्ज निकाली काढणेकरीता वारंवार मुदतवाढ देण्यात आलेली होती. परंतु अद्यापही शैक्षणिक वर्ष २०२०.२१ मधील मागासवर्गीय प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांनी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित असल्याचे दिसत येत आहेत तसेच मागासवर्गीय विद्यार्थी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहत असल्याची शक्यता नाकरता येत नाही.

त्यानुषंगाने **जिल्हयातील सर्व कॉलेज अनुदानित/विनाअनुदानित मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे महाविद्यालयांना पुन:पुन:सुचित करण्यात येते, शैक्षणिक वर्ष २०२०.२१ मधील प्रवेशित पात्र अर्ज करणेकरीता व अर्ज नुतणीकरणास (New/Renewal) दिनांक ३० सप्टेंबर २०२१ अखेर मुदतवाढ देणेत आलेली आहे. तसेच सन २०१९-२० वर्षातील प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुन्हा अर्ज करण्याची (Re-Apply) करण्याची दिनांक १५ सप्टेंबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.** त्यानुसार जिल्हयातील सर्व कॉलेज अनुदानित/विनाअनुदानित महाविद्यालयांनी प्रलंबित असलेल्या मागासवर्गीय प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन घेण्यात यावेत तसेच सदर प्रलंबित अर्जाची विहीत मुदतीत शिष्यृवत्तीचे शासन नियमाच्या अटी व शर्तीनुसार तपासणी करुन पात्र अर्ज तात्काळ सहायक आयुक्त, समाज कल्याण यांचे कार्यालय लॉगीनमध्ये पाठविणेत यावेत. विहीत मुदतीनंतर मागासवर्गीय पात्र विद्यार्थी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्यास सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय जबाबदार राहणार नाही व त्यास संबंधित कॉलेज/ महाविद्यालय प्राचार्य यांची सर्वस्वी जबाबदारी राहील. असे आवाहन श्री. नितीन उबाळे, सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांनी केले आहे.

कार्यालय अधिक्षक (प्रभारी)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग

**सहायक आयुक्त ,समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा 415003.

दुरध्वनीक्र.02162-298106 Email-acswosatara@gmail.com.

---

क्र.सआसकसा/भासशि/उपयोगिता प्रमाणपत्र/२०-२१/ 3025 दिनांक : 28.०९.२०२१

**तात्काळ / विहीत काल मर्यादा**

प्रति,

प्राचार्य,

सर्व महाविद्यालये

सातारा जिल्हा

विषय- सन २०११-१२ ते सन २०१७-१८ या वर्षाचे अनुसूचित जाती/विजाभज विमाप्र/इमाव प्रवर्गातील विदयार्थ्यांना अदाकरण्यात आलेल्या भारत सरकार शिष्यवृत्ती/शिक्षण फि परिक्षा फी या योजनेच्या उपयोगिता प्रमाणपत्रा बाबत.

संदर्भ- मा.आयुक्त समाज कल्याण महाराष्ट्रराज्य पुणे यांचे कार्यालया कडील दि. २७.०९.२०२१ रोजीचे performance Audit चे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भाच्या अनुषंगाने अनुसूचित जाती व विजाभज/विमाप्र/इमाव प्रवर्गातील विदयार्थ्यांची भारत सरकार शिष्यवृत्ती /शिक्षण फि परिक्षा फी योजनेचे फि अदा करणेत आलेलीआहे. विदयार्थ्यांना व महाविदयालयांना अदा करणेत आलेल्या फि चे उपयोगिता प्रमाणपत्र या कार्यालयास ( सन २०११-१२ ते सन २०१७-१८) वर्ष निहाय त्वरित सादर करणेत यावे. सोबत विहीत नमुन्यात माहिती दि.८.१०.२०२१ पर्यंत या कायार्सलयास साद रकरणेत यावेत. दि.८.१०.२०२१ पर्यंत ज्या महाविदयालयाची माहीती प्राप्त होणार नाही.त्या महाविदयालयाची माहीती निरंक पाठविणेत येईल. याची नोंद गांभिर्याने घणेत यावी. सोबत विहीत नमुना जोडणेत आलेला आहे.

(नितीन उबाळे)

सहाय्यक आयुक्त ,

समाज कल्याण सातारा.

प्रत-

१. मा. प्रादे.उपायुक्त.समाज कल्याण पुणे विभाग पुणे, यांचे माहीतीस्तव सविनय सादर.

Scanned with CamScanner

**Para No. 3.3 Non-submission of Utilisation Certificates**

| अ.क्र. | महाविदयालयाचे नाव | जातीचा प्रवर्ग | योजनेचे नाव | लाभार्थी संख्या | शैक्षणिक वर्ष | कोणत्या वर्षाच्या उपयोगिता प्रमाणपत्रे या कार्यालयास सादर करणेत आलेली आहेत त्याचा जा.क्र. व दिनांक. | सादर केलेल्या उपयोगित प्रमाणपत्रांची एकूण रक्कम | किती रक्कमेची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणे प्रलंबित आहेत | प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रांची एकूण रक्कम | उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न करण्याची कारणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

Scanned with CamScanner

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
**सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा ४१५००३

समता न्याय एकात्मता

दूरध्वनी क्र. (०२१६२) २९८१०६ E mail- acswosatara@gmail.com

क्र. क्र. सआसकसा/भासशि/DBT/21-22/ 466 दिनांक : 10/02/2022

प्रति,
प्राचार्य,
कनिष्ठ, वरिष्ठ/ अनुदानित/विनाअनुदानित,
तांत्रिक/औषधनिर्माण/नर्सिंग/वैद्यक/कृषी इ. महाविद्यालये
जिल्हा सातारा

विषय : शैक्षणिक वर्ष 2021-22 मधील प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या भारत सरकार शिष्यवृत्ती व फ्रिशीप योजनेचे महाडीबीटी प्रणालीवरील प्रलंबीत अर्जांबाबत

संदर्भ :
1) सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे पत्र क्र. 3881 दि. 29/12/21
2) मा. सह आयुक्त (शिक्षण) समाज कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांची बैठक दिनांक 16/10/21
3) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण पुणे विभाग पुणे यांचेकडील आढावा बैठक दि. 11/1/22
4) सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांनी घेतलेली ऑनलाईन आढावा बैठक 8/01/22
5) सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे पत्र क्र. 108 दि. 11/01/22
6) सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांनी घेतलेली ऑनलाईन आढावा बैठक 12/01/22
7) मा. जिल्हाधिकारी, सातारा यांचे पत्र क्र. 221 दिनांक 21/01/22
8) या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. 254 दिनांक 25/01/2022

जिल्ह्यातील विविध महाविद्यालयात प्रवेशित अनुसूचित जाती, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती आणि शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क या योजनांचा लाभ दिला जातो. सदर योजनांची अंमलबजावणी सन 2018-19 या शैक्षणिक वर्षापासुन ऑनलाईन https://mahadbtmahait.gov.in या संकतेस्थळावर करण्यात येते.

**सन** 2021-22 या शैक्षणिक वर्षाचे ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी संकेतस्थळ दिनांक 14 **डिसेंबर** 2021 पासुन शासनामार्फत सुरु करण्यात आलेले आहे अर्ज भरण्यासाठी **15 फेब्रुवारी 2022 हि अंतिम मुदतावढ** देण्यात आलेली आहे. याबाबत आपणांस संकेतस्थळाव्दारे तसेच समाज कल्याण विभागामार्फत वेळोवेळी अवगत करण्यात आलेले आहे. तथापि, संकेतस्थळाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले आहे की, अद्यापही काही महाविद्यालयातील मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याचे व मंजुरीचे प्रमाण अल्प आहे. त्या अनुषंगाने सातारा जिल्हयाचे कामकाज कमी झाल्याचे दिसुन येते. सन 2021-22 हे शैक्षणिक वर्ष संपण्यास केवळ 45 दिवसांचा कालावधी उरलेला आहे. सबब अर्ज न भरलेले मागासवर्गीय विद्यार्थी त्यांना मिळणा-या लाभापासुन वचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

